संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०४७ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६

## सोशल मीडियावर लाखो फॉलोअर्स असणाऱ्या रिल्स स्टार निर्मला नवले पराभूत; राष्ट्रवादीला मोठा धक्का



शिरूर तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणूक चर्चेचा विषय ठरत आहे. कारण कारेगावच्या माजी सरपंच निर्मला नवले यांचा निवडणुकीत पराभव झाला. त्यांच्या विरोधात लढलेल्या भाजपच्या मनीषा पाचंगे यांनी सुमारे 2,700 मतांच्या फरकाने विजय मिळवला. निर्मला नवले या गेल्या काही वर्षांत सोशल मीडियामुळे मोठ्या प्रमाणावर चर्चेत होत्या. त्यांच्या व्हिडिओंना लाखो व्ह्यूज मिळत होते. प्रचाराच्या काळात त्यांच्या सभांनाही मोठी गर्दी जमायची. त्यामुळे त्या सहज जिंकतील, असा अंदाज अनेकांनी बांधला होता. मात्र प्रत्यक्ष मतदानात मतदारांनी वेगळाच निर्णय घेतला. सोशल मीडियावर लोकप्रियता असली, तरी निवडणूक जिंकण्यासाठी जमिनीवरचं काम अधिक महत्त्वाचं ठरतं. मनीषा पाचंगे यांनी प्रचाराच्या काळात सातत्याने घराघरात भेटी दिल्या, स्थानिक प्रश्न ऐकून घेतले आणि मतदारांशी थेट संवाद साधला. त्यांच्या या नियोजित आणि शांत प्रचाराचा फायदा अखेरीस निकालात दिसून आला. दुसरीकडे, निर्मला नवले यांची ओळख प्रामुख्याने डिजिटल माध्यमांपुरती मर्यादित राहिली, अशी चर्चा आता राजकीय वर्तुळात सुरू आहे. सभांमधील गर्दी आणि सोशल मीडियावरील प्रतिसाद असूनही प्रत्यक्ष लोकांनी त्यांना मतदान केलं नाही. निर्मला नवले या आयटी इंजिनिअर असून सरपंच झाल्यानंतर "उच्चशिक्षित सरपंच" म्हणून त्यांचं कौतुक केलं जात होतं. सोशल मीडियावर त्यांचे पाच लाखांहून अधिक फॉलोअर्स आहेत. आलिशान गाडीचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर त्या अधिक चर्चेत आल्या होत्या.

# सत्ताधारी महायुतीचा डंका, महाविकास आघाडीची हाराकिरी कायम

## दिग्गजांना पराभवाचा धक्का




**मुंबई (दै. संध्या)**

राज्यातील 12 जिल्हा परिषद आणि 125 पंचायत समितीचा निकाल आज जाहीर झाला असून अनेक ठिकाणी बड्या नेत्यांना, नेत्यांच्या नातेवाईक व कुटुंबीयांना पराभव धक्का बसला आहे. त्यामुळे, जनतेनं आपला कौल देताना नेतेमंडळींनाही धडा शिकवल्याचं दिसून येत आहे. सोलापूर, परभणी, सातारा, सांगली, लातूरसह विविध जिल्ह्यातील आमदार, खासदार व नेतेमंडळींच्या नातेवाईकांना पराभव स्वीकारावा लागल्याने नेत्यांची नाचक्की झाली. विशेष म्हणजे, परभणी जिल्ह्यात माजी मंत्री सुरेश वरपूडकर यांनी आपल्या 5 नातेवाईकांना जिल्हा परिषद निवडणुकांच्या मैदानात उतरवलं होतं. मात्र, 5 पैकी 4 जणांचा पराभव पत्कारावा लागला असून त्यांचा एक पुतण्यात काँग्रेसच्या तिकीटावर विजयी झाला आहे. तर, मंत्री जयकुमार गोरेंच्या घरातील सदस्यांचा पराभव झाला आहे.

भाजप नेते तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांना सातारा जिल्ह्यात जिल्हा परिषद निवडणुकीत दोन धक्के बसले आहेत. जयकुमार यांचे बंधू अरुण गोरे यांचा माण तालुक्यातील कुकुडवाड गटात पराभव झाला, येथे राष्ट्रवादीचे अनिल देसाई विजयी झाले आहेत. तर औंध गटात देखील मंत्री जयकुमार गोरे यांचे बंधू अंकुश गोरे यांच्या पत्नी भारती गोरे यांचा 40 मतांनी पराभव झाला, येथे राष्ट्रवादीच्या मनिषा फडतरे विजयी झाल्या आहेत.

भाजप नेते तथा माजी आमदार त्र्यंबक भिसे यांना हा मोठा धक्का बसला असून लातूर जिल्ह्यातील कामखेडा जिल्हा परिषद गटातून काँग्रेसच्या आशाताई भिसे यांचा विजय झाला आहे. येथे भाजपाच्या सरिता भिसे यांचा पराभव झाला असून सरिता भिसे माजी आमदार त्रिंबक भिसे यांच्या भावजय आहेत. लातूर ग्रामीणचे माजी आमदार असलेल्या त्र्यंबक भिसेंनी काही दिवसापूर्वीच काँग्रेसमधून भाजपात प्रवेश केला होता.

माथाडी कामगार संघटनेचे नेते नरेंद्र पाटील यांच्या पत्नीचा पराभव झाला असून शिवसेनेच्या 22 वर्षांच्या मृणाल महेश पाटील यांनी त्यांचा पराभव केला. जिल्ह्यातील सर्वात लहान जिल्हा परिषद सदस्य मृणाल महेश पाटील विजयी झाल्या आहेत. मंत्री शंभूराजे यांना आपला गड राखण्यात यश आलं.

लातूर जिल्ह्यातील भाजपाचे माजी खासदार सुधाकर श्रृंगारे यांच्या कन्येला पराभव पत्कारावा लागला आहे. रोहिना जिल्हा परिषद गटातून सुप्रिया श्रृंगारे पायाळ यांचा पराभव झाला आहे. येथे राष्ट्रवादी काँग्रेसच्या उषा कांबळे यांचा विजय झाला आहे.

माजी आमदार दिनकर माने यांनाही निवडणूक निकालात धक्का बसला असून सदिच्छा विनोद माने भाजप यांचा पराभव झाला आहे. जिल्हा परिषद गटातून त्यांचा पराभव झाला, काँग्रेसच्या वनिता माने यांनी 595 मतांनी त्यांचा पराभव केला. काही दिवसापूर्वी शिवसेनेतून भाजपात पक्षप्रवेश केलेले दिनकर माने यांना हा मोठा झटका आहे.

सुरेश वरपूडकर यांची कन्या सोनल देशमुख या झरी जिल्हा परिषद गटातून मशालीच्या चिन्हावर उभ्या होत्या. मात्र, सोनल वरपूडकर यांना पराभव पत्कारावा लागला आहे, भाजपचे उमेदवार दिलीप देशमुख यांनी त्यांचा पराभव केलाय. दुसरीकडे त्यांचे चिरंजीव समशेर वरपूडकर हे शिंगणापूर जिल्हा परिषद गटातून उभे होते त्या ठिकाणी मशाल या चिन्हावर उभे असलेले पांडुरंग खिल्लारे यांनी समशेर वरपूडकर यांचा पराभव केला. दुसरीकडे त्यांच्या सुनबाई प्रेरणा वरपूडकर या दैठणा जिल्हा परिषद गटातून निवडणुकीसाठी उभ्या होत्या, त्या ठिकाणीही काँग्रेसच्या ज्योत्स्ना गणेश घाडगे यांनी त्यांचा पराभव केलाय. त्यामुळे वरपूडकर यांचे घरातील तीनही उमेदवार पराभूत झाले आहेत.

मोहोळमध्ये कुरुल जिल्हा परिषद गटातून राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील स्वतः उमेदवार असून ते पराभूत झाले आहेत. तर, नरखेड जिल्हा परिषद गटातून उमेश पाटील यांचे बंधू संतोष पाटील यांचा पराभव झाला आहे. राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे चिरंजीव सुरज पाटील यांचाही पंचायत समिती निवडणुकीत विजय झाला आहे.

सांगली जिल्ह्यात रयत क्रांती संघटनेचे प्रमुख आमदार सदाभाऊ खोत यांच्या सूनबाई मोहिनी खोत बागणी जिल्हा परिषदेतून विजयी झाल्या आहेत. तर, आमदार अब्दुल सत्तार यांचे चिरंजीव अब्दुल आमेर अंभई गटातून जवळपास 3435 हजार मतांनी विजयी झाले आहेत. भाजपच्या त्र्यंबक मारोती गव्हाणे यांचा त्यांनी पराभव केला.

सांगलीच्या आटपाडी तालुक्यातील निंबवडे जिल्हा परिषद गटात भाजपच्या उमेदवार माधवी पडळकर विजयी झाल्या आहेत. शिंदेंच्या शिवसेनेच्या उमेदवार विद्या मोटे यांचा 980 मतांनी पराभव झाला. माधवी पडळकर या भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्या वहिनी आणि जिल्हा परिषदेचे माजी सभापती राहिलेले ब्रह्मानंद पडळकर यांच्या पत्नी आहेत.

सोलापूर जिल्ह्यात सांगोला पंचायत समितीवर माजी आमदार शहाजीबापू पाटील यांच्या सुनबाई विजयी झाल्या असून शहाजीबापू पाटलांना अश्रू अनावर झाल्याचं पाहायला मिळालं. अक्कलकोट तालुक्यातील चपळगाव जिल्हापरिषद गटातून भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पत्नी शांभवी कल्याणशेट्टी विजयी झाल्या आहेत. तर, चपळगाव पंचायत गणातून आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे बंधू सागर कल्याणशेट्टी विजयी झाले आहेत.

## आंबेगावमध्ये राष्ट्रवादीचा दबदबा कायम; विवेक वळसे पाटील, विष्णूकाका हिंगे पाटील यांचा दणदणीत विजय



अवसरी (आंबेगाव): आंबेगाव तालुक्यातील पूर्व भागात झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांनी राजकीय वातावरण तापवले होते. अत्यंत चुरशीच्या आणि अटीतटीच्या लढतीत राष्ट्रवादी काँग्रेसने आपला दबदबा कायम राखत महत्त्वाचे गट जिंकले आहेत. पारगाव जारकरवाडी जिल्हा परिषद गटातून माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांचे पुतणे विवेक वळसे पाटील यांनी तब्बल २,९६७ मतांच्या फरकाने विजय मिळवला. तर अवसरी-पिंपळगाव जिल्हा परिषद गटात विष्णूकाका हिंगे पाटील यांनी ६०५ मतांनी प्रतिस्पर्ध्यांचा पराभव करत यश संपादन केले. या विजयाची घोषणा होताच अवसरी परिसरात राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष करत फटाक्यांची आतषबाजी केली. "राष्ट्रवादीचा किल्ला अबाधित" अशा घोषणा देत कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला. पंचायत समिती निवडणुकीतही राष्ट्रवादीने आघाडी घेतली आहे. अवसरी गणातून नीलेश नामदेव टेमकर यांनी २,९०० मतांच्या फरकाने, तर पिंपळगाव गणातून शिवाजी संपत निघोट यांनी ५१४ मतांनी विजय मिळवला. याशिवाय जारकरवाडी पंचायत समिती गणात राष्ट्रवादी काँग्रेसच्या अंकिता अनिल वाळुंज, तर पारगाव गणातून राष्ट्रवादी (शरद पवार गट) च्या श्वेता किरण ढोबळे या विजयी झाल्या आहेत. या निकालांमुळे आंबेगाव तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसची राजकीय ताकद पुन्हा एकदा अधोरेखित झाली असून आगामी स्थानिक राजकारणात या विजयाचा मोठा प्रभाव दिसून येण्याची शक्यता आहे.

## भोरमध्ये ५०-५०! मतदारांची राष्ट्रवादी अन् भाजपला पसंती

भोर : भोर तालुक्यात जिल्हा परिषदेच्या दोन जागा भाजपला तर दोन जागा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला मिळाल्या आहेत. तर पंचायत समितीच्या आठ पैकी चार जागा भारतीय जनता पार्टीला तर चार जागा राष्ट्रवादी काँग्रेसला मिळाल्या आहेत. रणजीत शिवतरे यांच्यासह दोन माजी जिल्हा परिषद सदस्यांना पराभवाला सामोरे जावे लागले आहे. भाजपाला प्रथमच घवघवीत यश मिळाले आहे. कान्होजी जेधे शासकीय औद्योगिक संस्था येथे सकाळी निवडणूक निर्णय अधिकारी डॉ विकास खरात यांच्या प्रमुख उपस्थितीत मतमोजणीला सुरुवात झाली. पहिला निकाल वेळू गणातील भाजपाचे उमेदवार ज्ञानेश्वर पांगारे यांनी १५३४ मतांनी उद्धव ठाकरे गटाचे महेंद्र भोरडे यांचा पराभव करत मिळवला. नसरापूर गणा मधून अजित पवार गटाचे विशाल कोंडे यांनी १२५५ मतांनी भाजपाचे अमोल शिळीमकर यांचा पराभव केला. वेळू नसरापूर या जिल्हा परिषद गटामधून भाजपाचे पोपट सुके यांनी उद्धव ठाकरे गटाचे अनिकेत शिंदे यांचा ७१६ मतांनी पराभव केला. भोंगवली गणा मधून भाजपाचे रोहन बाठे यांनी अपक्ष उमेदवार अक्षय सोनवणे यांचा ४९८ मतांनी पराभव करत विजय मिळवला. कामथडी गणातुन राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या तृप्ती खुटवड यांनी भाजपाच्या नीता इंगुळकर यांचा १४३६ मतांनी पराभव केला. जिल्हा परिषदेच्या कामथडी भोंगवली गटामधून राष्ट्रवादी अजित पवार गटाचे पंचायत समितीचे माजी उपसभापती विक्रम खुटवड यांनी अपक्ष उमेदवार माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत बाठे यांचा १७९४ मतांनी पराभव करून विजय मिळवला. भोलावडे गणातून राष्ट्रवादी अजित पवार गटाचे राजेश बोडके यांनी भाजपाचे काळूराम मळेकर यांचा २९४ मतांनी पराभव केला. शिंदे गणामधून राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या मनीषा संतोष कंक यांनी भाजपाच्या मनीषा पारठे यांचा २५४० मतांनी पराभव करून विजय मिळवला. जिल्हा परिषद भोलावडे शिंदे गटामधून राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रवीण जगदाळे यांनी भाजपाचे माजी जिल्हा परिषद सदस्य विठ्ठल आवळे यांचा ५१४ मतांनी पराभव करून विजय मिळवला.

## पुरंदरमध्ये शिवसेनेचा बालेकिल्ला ढासळला, राष्ट्रवादीची मुसंडी अन् दोन ठिकाणी 'कमळ' फुलले..

**सासवड (दै. संध्या)**

पुरंदर तालुक्यात झालेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत मोठा राजकीय फेरबदल पाहायला मिळाला आहे. शिवसेनेचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या या तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसने जोरदार मुसंडी मारत जिल्हा परिषदेच्या दोन आणि पंचायत समितीच्या चार जागांवर कब्जा मिळविला आहे. विशेष म्हणजे, भाजपनेही माजी आमदार संजय जगताप यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषदेच्या दोन आणि पंचायत समितीच्या दोन जागा जिंकत तालुक्यात पहिल्यांदाच कमळ फुलवले आहे. या निकालांमुळे विद्यमान आमदार विजय शिवतारे यांना मोठा धक्का बसला आहे. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनामुळे संपूर्ण तालुक्यात शोककळा होती, ज्याची मोठी सहानुभूती निकालांमधून दिसून आली. दुसरीकडे, माजी आमदार संजय जगताप यांच्या भाजप प्रवेशामुळे भाजपला बळ मिळाले, तर स्वबळावर लढल्यामुळे अनेक ठिकाणी 'क्रॉस वोटिंग' आणि वैयक्तिक संबंधांना मतदारांनी पसंती दिल्याचे स्पष्ट झाले आहे.



गटवार निकाल:

१. दिवे-गराडे गट: राष्ट्रवादीचा एकतर्फी विजय

या गटात राष्ट्रवादीने वर्चस्व गाजवत तिन्ही जागा खिशात घातल्या आहेत.

जिल्हा परिषद विजयी: रूपाली अमोल झेंडे (राष्ट्रवादी) - २१८२४ मते.
पराभूत: दिव्या संदीप जगदाळे (भाजपा) - ७८३४ मते.
ज्योती राजाराम झेंडे (शिवसेना)

गराडे गण विजयी: अर्चना ज्ञानेश्वर कटके (राष्ट्रवादी) - ८०४३ मते.
पराभूत: सुप्रिया विशाल रावडे (शिवसेना) - ४७९७ मते.
ललिता दिलीप कटके (भाजपा)

दिवे गण विजयी: अमित भाऊसाहेब झेंडे (राष्ट्रवादी) - १३४५६ मते.
पराभूत: बाळासाहेब दगडू मगर (शिवसेना) - ३३२० मते.
देविदास संभाजी कामथे (भाजपा)

२. बेलसर - माळशिरस गट: भाजपची एन्ट्री

येथे काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या दिग्गजांना पराभवाचा धक्का बसला आहे.

जिल्हा परिषद विजयी: अजय कैलास इंगळे (भाजपा) - ७६२७ मते.
पराभूत: दत्तात्रेय मारुती झुरंगे (काँग्रेस) - ६२०३ मते.
अमोल दत्तात्रेय कामठे (शिवसेना उ.बा.ठा.)
गौरव विजय कोलते (राष्ट्रवादी)
रमेश रामचंद्र इंगळे (शिवसेना)

माळशिरस गण विजयी: माऊली यादव (भाजपा) - ५४२४ मते.
पराभूत: अजिंक्य रामदास कड (राष्ट्रवादी) - ३८२९ मते.
शरद बाळासाहेब यादव (शिवसेना)
हनुमंत मुरलीधर काळाणे (काँग्रेस)

बेलसर गण विजयी: माणिक बाळासाहेब निंबाळकर (शिवसेना) - ४८०७ मते.
पराभूत: निलेश कृष्णा जगताप (राष्ट्रवादी) - ४३०८ मते.
कैलास पंढरीनाथ जगताप (भाजपा)
कुशाल संजय कोलते (काँग्रेस)

३. वीर - भिवडी गट: शिवतारेंच्या बालेकिल्ल्याला खिंडार

शिवसेनेचा हा बालेकिल्ला भाजपने भेदला असून येथे चुरशीची लढत झाली.

जिल्हा परिषद विजयी: हरीभाऊ कुंडलिक लोळे (भाजपा) - ११६३० मते.
पराभूत: समीर अरविंद जाधव (शिवसेना) - ११०७३ मते.
पुष्कराज संजय जाधव (राष्ट्रवादी)

भिवडी गण विजयी: सायली मनोज शिंदे (भाजपा) - ६७९१ मते.
पराभूत: पूजा सागर मोकाशी (शिवसेना) - ५९२० मते.
अनुजा अमोल पोमण (राष्ट्रवादी)

वीर गण विजयी: प्रवीण बाळासाहेब जगताप (शिवसेना) - ५९४० मते.
प्रमुख पराभूत: सुधीर शिवाजीराव धुमाळ (भाजपा) - ५७९१ मते.
उत्तम महादेव धुमाळ (राष्ट्रवादी)
महेश चंद्रकांत धुमाळ (काँग्रेस)

४. निरा - शिवतक्रार गट: राष्ट्रवादीची सरशी

जिल्हा बँक अध्यक्ष डॉ. दिगंबर दुर्गाडे यांच्या कन्या प्राजक्ता दुर्गाडे यांनी प्रतिष्ठा राखली.

जिल्हा परिषद विजयी: प्राजक्ता दिगंबर दुर्गाडे (राष्ट्रवादी) - १३५२१ मते.
पराभूत: भारती अतुल म्हस्के (शिवसेना) - ७८०३ मते.
सीमा संदीप धायगुडे (भाजपा)
सविता राजेंद्र बरकडे (काँग्रेस)

कोळविहीरे गण विजयी: स्मिता संतोष निगडे (राष्ट्रवादी) - ५७२९ मते.
पराभूत: शितल सतीश साळुंके (शिवसेना) - ४६६३ मते.
सीमा भाग्यवान म्हस्के (भाजपा)
रत्नमाला दिलीप खैरे (काँग्रेस)

निरा - शिवतक्रार गण विजयी: मोनिका स्वप्नील कांबळे (राष्ट्रवादी) - ६१३६ मते.
पराभूत: वंदना बाळासाहेब भोसले (भाजपा) - ३९६३ मते.
रेखा नितीन केदारी (शिवसेना)
गीता शुद्धोधन सोनवणे (काँग्रेस)

पंचायत समितीत आता त्रिशंकू परिस्थिती निर्माण झाली असून, सत्तास्थापनेसाठी कोणाची कोणाला मदत मिळते हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

| जि. प. सदस्य | भाजप | शिवसेना | राष्ट्रवादी | काँग्रेस | ठाकरे सेना | राष्ट्रवादी श.प. | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७१४/७३१ | २२५ | १६२ | १७२ | ५५ | ४६ | २१ | ३३ |

## संपादकीय

# पेरले ते उगवले

पाकिस्तानातील मशिदीतील स्फोटाची जबाबदारी घेणारा आयसिस म्हणजे इराक आणि सीरीयातील सुन्नी मुस्लिम गट आहे. त्यांचा उद्देश्य असतो की शियांच्या धार्मिक स्थळांवर हल्ले करायचे आणि त्यांना ठार मारायचे. काही वर्षापूर्वी त्यानी लाखो लोकांवर राज्य केले आणि त्याद्वारे आपली दहशत पसरवली. इस्लामाबादमधील एका शिया पंथाच्या दर्ग्यानजीक एका आत्मघातकी मानवी बाँबने स्वतःला उडवले. या स्फोटात ३१ लोक ठार तर १६९ जण जखमी झाले. तरलाई इमामबर्ग येथे हा शक्तीशाली बाँबस्फोट झाला.आता पाकिस्तानने अफगाणिस्तानवर आणि भारतावर या स्फोटाचे खापर फोडले.

पाकिस्तानचे म्हणणे आहे, की अफगाणिस्तानच्या दहशतवाद्यांनी स्फोट घडवला पण भारताने त्यांना आर्थिक मदत केली. पाकचा हा कुटील कांगावा आहे हे सहज लक्षात येते. कारण भारत कुणाच्याही देशात ढवळाढवळ करत नाही आणि पाकच्या उलट्या काळजाच्या देशात तो असे उद्योग करण्याची शक्यता जवळपास नाही. अद्याप कोणत्याही गटाने स्फोटाची जबाबदारी स्वीकारली नाही. तरीही पाकने अफगाणिस्तान आणि भारतावर या स्फोटाचे खापर फोडले. मुळात पाकने आतापर्यंत दहशतवाद्यांना पोसण्याचे काम केले. तो दहशतवाद्यांचा सरपरस्त आहे. त्यामुळे पाकचे औषध त्यालाच पाजण्यात आले. कारण पाकने आतापर्यंत हेच केले. त्याने निरपराध भारतीय नागरिकांना ठार केले. तेही शेकड्यांनी. २००८ चा बॉम्बहल्ला आणि दहशतवाद्यांचा धूडगूस आणि भारतातील ट्रेनमध्ये घडवलेले स्फोट मालिका अशी कितीतरी उदाहरणे आहे. त्यामुळे पाकवर असा दशहतवादी हल्ला झाला तर त्याबद्दल फारसे वाईट वाटण्याचे काही कारण नाही. पाकला सुसाईड बॉंबहल्ले नवे नाही. तीन महिन्यांपूर्वी इस्लामाबाद येथे अशाच एका सुसाईड बॉंबरने हल्ला केला होता. या हल्ल्याचा पाकचे अध्यक्ष आणि पंतप्रधान यांनी निषेध केला. पण त्यात काही अर्थ नाही. कारण आतापर्यंत पाकने जे पेरले तेच उगवले. त्यातही पाकचा खोटारडेपणा असा, की भारतावर आरोप करताना पाक हे विसरला, की भारत दुसऱ्या देशात असे उद्योग करत नसतो. हे पाकचे काम आहे. पाकिस्तानचा मित्र म्हणून चीनने या हल्ल्याचा निषेध केला. कोणताही हल्ला होणे आणि त्यात निरपराध नागरिकांचे बळी जाणे हे नेहमीच वाईट असते. पण पाकने भारतावर पूर्वी असेच हल्ले केलेत. पेहलगाम येथे निरपराध हिंदू कुटुंबियांना पाकच्या दहशतवाद्यांनी वेचून ठार केले. त्यामुळे पाकने आता कितीही व्याख्यान झोडले तरीही पाकचे कृत्य नापाक आहे हे जगापासून लपून राहिलेले नाही. पाकचे गृहमंत्री मोहसिन नकवी यांनी म्हटले, की भारताने अफगाणिस्तानातील दहशतवाद्यांना पैशाची मदत केली आणि त्यामुळेच हा हल्ला झाला. पण त्यांनी कोणतेही पुरावे दिले नाही. मागेही भारतातील हल्ले पाक पुरस्कृत होते. पाकने चीनच्या मदतीने मसूद अझर याला अनेक वर्षे दहशतवादी घोषित करण्यास अडथळे आणले. त्यात चीनने आपला व्हेटो अधिकार वापरून मसूदला दहशतवादी घोषित करू दिले नाही. भारताने कित्येक वेळा पाककडे अझरला आपल्या हवाली करण्याची मागणी केली होती. पण तसे झाले नाही. तोच पाकिस्तान आता भारतावर आरोप करत आहे. खरी वस्तुस्थिती अशी आहे, की आपल्या सामाजिक रचनेला भेडसावणाऱ्या समस्यांवर उपाय शोधण्याऐवजी पाकिस्तान भारत किंवा अन्य एखाद्या देशाविरोधात असे कट रचल्याचा आरोप करतात पण त्यात तथ्य नसते. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात शाब्दिक युद्ध सुरु झाले. कारण पाकचा आरोप निराधार आहे. हे भारताच्य संरक्षण मंत्रालयाने स्पष्ट केले असून पाकने स्वतःची सुरक्षा यंत्रणा तपासावी आणि त्यातील कमतरता दूर कराव्यात असा सल्ला दिला. पाकिस्तानी सरकार आणि मीडिया नेहमीच असे बेजबाबदार आणि हास्यास्पद आरोप कुठल्याही पुराव्याशिवाय करतात आणि हा प्रकार त्यातलाच आहे. पाक हा नेहमीच भारत तर कधी अफगाणिस्तानवर आरोप करतो. पाकवर मृतांच्या कुटुंबियाना उत्तरे देण्याची जबाबदारी वाढत आहे आणि त्यापासून आपली सुटका करून घेण्यासाठी पाक असे डाव आखतो. इस्लामाबादमधील घटनेने केवळ देशातील प्राणघातक सुरक्षा त्रुटी उघड केल्या नाहीत तर प्रादेशिक तणावही वाढवला आहे. पाकिस्तानने दहशतवाद्यांशी लढण्यात आपण शून्य प्रगती केल्याचे दाखवून दिले.

## संस्कृत सुभाषित

मित्रं वा बन्धुं वा वैवातिप्रणयपीडितं कुर्यात।
स्वम वत्समतिपिबन्तं विषाण कोट्याक्षिपति धेनु:।।

अर्थ : मित्राच्या किंवा आप्ताच्या प्रेमाचा फार फायदा घेऊ नये. स्वत:चे वासरू जर जास्त दूध पिऊन त्रास देत असेल तर गाय स्वत: त्यालाही शिंगानी ढोसून दूर करते.

## गुरु वचन

### जर मनच अशुद्ध तर...

खूप जुनी गोष्ट आहे. एकदा संत कबीर बसले होते. त्यांच्याकडे एक व्यापारी धावत आला. त्याने कबीरांना विनंती केली, 'मला तुम्हाला माझा गुरू करायचे आहे, तुम्ही मला गुरुमंत्र द्या' तेव्हा संत कबीरांनी त्याला पैसे दिले आणि सांगितले आधी तू पटकन जाऊन दूध घेऊन ये, मग मी तुला गुरुमंत्र देतो. त्या व्यापाऱ्याला खूप घाई होती. तो तडक धावत गेला आणि त्याने दूध कबीरांना आणून दिले. कबीरांनी त्याला एक भांडे दिले आणि सांगितले, हे दूध या भांड्यात ओत. त्याने ते भांडे घेतले, त्यात प्रचंड घाण साचली होती. त्या व्यापाऱ्याने कबीरांना ही बाब सांगितली. ते म्हणाले, बघ जर तू या खराब भांड्यात दूध टाकायला तयार नाहीस तर, मग मी तुझ्या अशुद्ध मनात राम नावाचा मंत्र कसा देऊ?' कबीरांनी म्हटलेले वाक्य किती खरे आहे बघा? जर तुमचे मनच शुद्ध नाही तर तुम्ही देवाचे दर्शन घेतले काय, किंवा संत सानिध्यात राहिलात काय, त्याचा काय परिणाम होणार? संतांनीही हेच सांगितले आहे. भलेही तुम्ही पुजा नका करू, परंतु तुम्ही तुमचे आचरण, आणि मन शुद्ध ठेवा. आपण इतरांना एखाद्या कामासाठी दोष देत असतो, पण त्याची त्यामागची भूमिका समजून घेणे गरजेचे असते. आणि आपण नेमके या उलटच करतो. आपल्या दैनंदिन कामात आपण अनेकांना भेटत असतो, यात प्रत्येक व्यक्ती आपल्याला चांगलीच भेटते असे नाही, तर प्रत्येकाचा स्वभाव वेगवेगळा असून शकतो. त्यांच्या स्वभावानुसार त्यांना काम देणे गरजेचे आहे. बदलायची असतील तर त्यांची मने बदलण्याचा प्रयत्न तुम्ही करा. त्यांच्या मनातील कटुता कमी करा. कारण कबीरांनी म्हटल्याप्रमाणे, खराब भांड्यात ज्या प्रमाणे तुम्ही दूध नाही टाकणार त्या प्रमाणेच एखाद्याचे मन परिवर्तन झाल्याशिवाय तुम्ही त्याला बदलू नाही शकणार.

## उपदेशकथा

### द्वेषाचे मूळ

एका शहरात राजमार्गावर चंदनाच्या लाकडाचे एक दुकान होते. त्या दुकानाचा मालक गल्ल्यावर बसलेला असे. दुकानाची तपासणी करून गोळा करणारा सरकारी अधिकारी दुकानात येऊन कराचे पैसे घेऊन जायचा. पण का कोणास ठाऊक; त्या मालकाला पाहिले की, त्या अधिकाऱ्याच्या मनात अतिशय नावड उत्पन्न होत असे. त्याला शिक्षा करावी असे उगीचच मनात येईल. अधिकाऱ्याला याचे फार आश्चर्य वाटे. हा काय प्रकार आहे ते समजून घ्यावे. म्हणून अधिकाऱ्याने मालकाला ऑफिसमध्ये बोलावले. अधिकाऱ्याने आपल्या मनात जे येते ते सांगितले. तेव्हा मालक म्हणाला, 'साहेब, माझा धंदा विशेष चालत नाही. तुम्हाला पाहिले की मनात येते तुम्ही मेला तर माझी पुष्कळ विक्री होईल. म्हणून माझे मन सारखे तुमच्या मृत्यूची इच्छा करते.'

कथा उपदेश : आपल्या मनातील प्रेमाचे वा द्वेषाचे विचार दुसऱ्याच्या मनावर जाऊन आदळतात. जगाला कळणार नाही. पण द्वेषाचे मूळ आपल्या मनातच असते.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | ०७:५४:५८ |
| १० फेब्रुवारी २०२५ | योग:ध्रुव २५:४१:४५+ |
| मंगळवार | करण:कौलव ०७:२७:२७ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:तैतिल २०:४३:२५ |
| माघ शके संवत्– १९४७ | सूर्य:मकर |
| संवत्सर – विश्वावसूनाम | चन्द्र:वृश्चिक०१:१०:५० |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४६ |
| मास– माघ | मुस्लिम मास – शाबान |
| ऋतु– सौर शिशिर | तारीख – २१ |
| कृष्ण पक्ष | विशेष |
| तिथि:अष्टमी ०७:२७:२७ | शुभ दिवस |
| नक्षत्र:विशाखा | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८५६


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 4 | 5 | 3 | | 1 | | 6 |
| | 5 | | 7 | 4 | | | 3 | |
| 2 | | | | | 6 | | 9 | 5 |
| | | 9 | | | 4 | 5 | 1 | |
| | | 2 | | | | 8 | | |
| | 7 | 8 | 6 | | | 3 | | |
| 9 | 2 | | 3 | | | | | 1 |
| | 4 | | | 9 | 5 | | 8 | |
| 1 | | 6 | | 2 | 7 | 9 | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. ८५५ चे उत्तर



## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १२५८ – मोंगोल सरदार हुलागु खानने बगदाद लुटले व तेथील नागरिकांची हत्या केली. अंदाज १०,००० ते ८,००,०००.
- १८४० – इंग्लंडची राणी व्हिक्टोरिया व सॅक्स-कोबर्ग-गोथाच्या राजकुमार आल्बर्टचे लग्न.
- १९३१ – भारताची राजधानी कोलकात्याहुन नवी दिल्ली येथे हलवली.
- १९८१ – लास व्हेगास येथे हॉटेलला आग. ८ ठार, १९८ जखमी.
- १९९६ – महासंगणक डीप ब्ल्युने बुद्धिबळात गॅरी कास्पोरोव्हला हरवले.
- २००६ – इटलीत तोरिनोयेथे विसावे हिवाळी ऑलिंपिक खेळ सुरू.

### राष्ट्रीय

- १८४६ – सोब्राओनची लढाई – इंग्लिश सैन्याविरुद्ध शीख सैन्याची हार.
- २००८ – भारताने सर्वाधिक ६७५ एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामने खेळण्याचा विक्रम केला.

### जन्म

१६८५ – एरन हिल, इंग्लिश लेखक यांचा जन्म.

- १८९४ – हॅरोल्ड मॅकमिलन, युनायटेड किंग्डमचा पंतप्रधान यांचा जन्म.
- १९५० – मार्क स्पित्झ, अमेरिकन तरणपटू यांचा जन्म.

### निधन

- ११६२ – बाल्डविन तिसरा, जेरुसलेमचा राजा यांचे निधन.
- १२४२ – शिजो जपानी सम्राट यांचे निधन.
- १८२९ – पोप लिओ बारावा यांचे निधन.
- १८३७ – अलेक्झांडर पुश्किन, रशियन लेखक यांचे निधन.
- १९१८ – अब्दुल हमीद दुसरा, ऑट्टोमन सम्राट यांचे निधन.

## : SMS :

Gadhe Ke samne 1 Pani ki,1 daru ki balti rakhi.Gadha Pani pi Gaya.Police Ne Sharabi se Pucha-Kya Sikha?? Sharabi-jo Daru nahi pita Woh Gadha Hai..

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २७.६ | १५.७ |
| अहमदनगर | २७.४ | १५.९ |
| अकोला | २९.५ | १६.३ |
| अमरावती | २८.६ | १५.६ |
| बीड | २९.५ | १५.८ |
| भंडारा | २८.६ | १५.७ |
| बुलढाणा | २१.५ | ९.४ |
| चंद्रपूर | २९.४ | १८ |
| चेन्नई | ३१.८ | २०.५ |
| नवी दिल्ली | २२.४ | ११.६ |
| धुळे | २९.५ | १५.६ |
| गोंदिया | २७.४ | १४.४ |
| जळगाव | २९.५ | १५.९ |
| कोल्हापूर | २९.३ | १५.६ |
| लातूर | २८.५ | १८ |
| मुंबई | ३०.५ | २२.५ |
| नागपूर | २७.८ | १५.३ |
| नांदेड | २९.३ | १८.१ |
| नंदूरबार | २८.४ | १७ |
| नाशिक | २८.६ | ११.७ |
| पुणे | २८.१ | १३.४ |
| पंढरपूर | २९.३ | १७.८ |
| सातारा | २९.५ | ९.४ |
| सांगली | ३०.२ | १६.५ |
| सोलापूर | २९.८ | १७.९ |
| वर्धा | २९.१ | १५.५ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग :जांभळा, शुभ दिशा :पश्चिम सामाजिक मान सन्मान मिळाल्याने आनंदी रहाल.

**तुळ :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे.

**वृषभ :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा: उत्तर प्रभावशाली व्यक्तित्वामुळे आपल्या गोष्टी लोकांपर्यंत पोहचविण्यात यशस्वी व्हाल.

**वृश्चिक :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा:पूर्व व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल.

**मिथुन :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: पश्चिम आर्थिक बाबतीमधील प्रकरणे सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी दिवस शुभ आहे.

**धनु :** शुभ रंग :निळा,शुभ दिशा:पश्चिम कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल.

**कर्क :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: दक्षिण न्यायालयीन कामात यश मिळेल. व्यापारात नुकसान होण्याचे योग आहेत.

**मकर :** शुभ रंग:लाल,शुभ दिशा: उत्तर व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे.


**सिंह :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पूर्व व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल.

**कुंभ :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण आपल्या बुद्धीच्या जोरावर आखलेल्या योजना यशस्वी होतील. कामकाजात बदल होण्याची शक्यता आहे.

**कन्या :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा: उत्तर जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा.

**मीन :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर प्रत्येक क्षेत्रात आपल्याला मान सन्मान मिळेल. शांत व विवेक बुद्धीने काम केल्यास यश मिळेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८५६



### आडवे शब्द

१. '--- निर्विघ्नं कुरु मे देव सर्व कार्येषु सर्वदा! (गणेशस्तवन)
११. मलाई
१२. हत्ती
१३. माहात्म्य
१४. पायजमा
१५. विखारी
१७. पौर्णिमेच्या विरुद्ध स्थिती
१९. विश्वासघात
२१. चाक
२२. ना फायदा – ना तोटा!
२३. भेग, पोकळ जागा
२५. कुळाला दिला जाणारा मोबदला
२७. कपाटातील कप्पा
२८. नगण्य किंमतीचे
२९. ख्रिश्चनांचे प्रार्थना मंदिर
३३. अस्वल-माकडांचा खेळ करणारा
३५. प्रधानमंत्री
३८. विशेष
४०. नम्रतेने मान झुकवलेला
४२. भीमजवळचे शस्त्र
४४. गजऱ्याचे सुगंधी पांढरे फूल
४५. बैलाचा सण
४६. बोजा, भार
४८. मागच्या अंगणाचा दरवाजा
५०. बोबडी वळल्यानंतर तोंडातून फुटणारा शब्द
५२. पत्नी, सुंदर स्त्री
५४. संताप
५६. उद्याच्या नंतरचा दिवस
५९. कढी-वरण इ.साठी भातात केला जाणारा खळगा
६०. वाकलेला
६१. बाह्यात्कारी
६४. अफूचे बी
६६. संधी, मोका
६७. मर्कट
६८. ही मनापासून केल्यास मेवा मिळतो
६९. गुलकंदातील साखर
७०. गुणांची, पारख करणारा
७२. आरोळी, गर्जना (हिंदी)
७४. लापशी
७५. खटला
७६. पातक
७७. मातीचा दिवा
७९. सात दिवसांचा काळ
८१. मयूर
८२. सरसकट
८३. फेरफटका
८४. पत्ता, ठिकाण

### उभे शब्द

१. व्रत
२. खरेदी-विक्री
३. डोंगराचा तुटलेला भाग
४. मला
५. नाहक वेळ घालविणे
६. रवि, तपन
७. कोन मोजण्याचे साधन
८. प्रश्न
९. पृथ्वी
१०. आगळीक
१५. हिशोब
१६. कागद मोजण्याचे एक परिमाण
१७. अशा प्रकारचा
१८. बडबड
२०. दोन ठकांची पडल्यास बघायलाच नको!
२१. सूत कातण्याचे साधन
२४. एकमेकांसमोर
२६. खिडकीची पातळ काच
३०. शेवट, अखेर
३१. कृष्णसखी
३२. अंगरखा
३४. घराण्याची चाल, वळण
३५. कमळ
३६. पायंडा, पद्धत
३७. पालिकेतील लोकप्रतिनिधी
३९. प्रयत्नावाचून, आपले आपण
४१. च्या साठी (सं.)
४३. सेवक
४७. अनेक नवस करून झालेला
४९. राक्षस
५१. शोध, माग
५३. सरशी
५५. गणपतीचे एक नाव
५७. पहारेकरी
५८. गंध
६२. विपतीचे कहाणी
६३. रूक्ष, उजाड
६५. बातमी
६६. छोटी वस्ती
६७. मारझोड
६८. किंमत वाढवून कमी करण्याचा चलाखीचा खेळ
६९. प्रयत्न
७१. उंबरठा
७३. लबाडीचा हेतू
७६. पवित्र
७७. सोंगट्याचे वस्त्र
७८. बाण, नदीच काठ
७९. आंब्याची पोळी
८०. कावेबाज खेळी?

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. ८५५ चे उत्तर

आडवे उत्तर : १.बाग २.परममित्र ५.सदानकदा ९.सवड १०.वाली ११.सवय १३.कारखाना १५.शावक १६.लहान १८.मारणे २०.हलाहल २२.जिना २३.वायदा २४.सई २५.समज २६अ.तव २७.सामना २८.सह ३०.हिरवा ३२.फरक ३४.आवाज ३५.दागिना ३७.दप्तर ३८.सडेतोड ४२.अग्र ४३.सम ४४.फरशी ४६.आपुलकी ४८.मस्तवाल ५१.लपणे ५३.सन ५४.काडतूस ५७.मोद ५८.एकत्र ५९.रव ६०.हाल ६१.कलह ६३.मैदान ६५.रमण ६८.पाकड ७०.रसदार ७३.मणेर ७४.कढी ७५.रयत ७७.पापी ७८.पडका ७९.नदी ८०.जपतप ८१.मळी ८२.रफार

उभे उत्तर : १.बारका २.पवना ३.रड ४.मिळवणे ५.सलील ६.नमन ७.दास ८.व्यय ९.सखा १२.वसाहत १४.रसना १५.शारदा १७.हापूस १८.मायना १९.आई २०.हजर २१.लवकर २२.जिराफ २३.वाम २४.सहज २६.महिना २७.साकडे २८.सवाल २९.दादा ३१.वादग्रस्त ३३.रसम ३६.गिरकी ३९.तोफ ४०.डर ४१.शेपु ४२.अमन ४३.सरकार ४५.शील ४६.आणे ४७.लवाद ४९.वादक ५०.सेतू ५२.पदक ५३.सर्वदा ५५.डवरणे ५६.सहाण ५७.मोहक ६२.लपाछपी ६४.नर ६६.मरण ६७.अढी ६९.डरकाळी ७१.सरकार ७२.रविवार ७३.मनन ७४.कळप ७६.तपन ७७.पाप

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### भैरव क्रांती शिक्षण प्रसारक मंडळ : अध्यक्ष व कार्यकारिणीची सर्वानुमते निवड जाहीर

पुणे (दैनिक संध्या) : समाजातील गोरगरीब, दिनदुबळे, वंचित तसेच भटक्या-विमुक्त जाती-जमातीतील मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या उदात्त हेतूने भैरव क्रांती शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे या शैक्षणिक संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. या संस्थेचा मुख्य उद्देश गोरगरीब व दुर्बल घटकातील मुलांसाठी शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणे हा असून, पुणे शहर व पुणे जिल्ह्यात विविध ठिकाणी शैक्षणिक संस्था उभारून विद्यार्थ्यांना योग्य शैक्षणिक मार्गदर्शन, नैतिक मूल्ये व शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे हे संस्थेचे प्रमुख ध्येय आहे. विशेषतः भटक्या व विमुक्त जाती-जमातीतील मुलांना मुख्य प्रवाहातील शिक्षणात आणून त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी ही संस्था सामाजिक उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून उभारण्यात आली आहे. या अनुषंगाने संस्थेच्या नवनियुक्त कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली असून, भैरव क्रांती शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे यांच्या अध्यक्षपदी श्री. शंकर नारायण जाधव यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. सदर निवडीची अधिकृत घोषणा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. विजय सुदामराव जाधव यांनी केली. तसेच संस्थेच्या इतर पदाधिकाऱ्यांची नियुक्ती पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे. कार्याध्यक्ष : श्री. दीपक पखाले, सचिव : श्री. गोविंदराव अटक, खजिनदार : श्री. प्रकाश सावंत, कार्यालयीन सचिव : श्री. दिनेश गवळी, सेक्रेटरी : सौ. पिंकी उर्फ प्रियंका जाधव, कोषाध्यक्ष : श्री. नितीन चव्हाण, संपर्कप्रमुख : श्री. मोहन शिंदे, सहसचिव : श्री. पोपटराव चौगुले, तसेच निवड समिती प्रमुखपदी श्री. गंगाराम शेगर यांची नियुक्ती करण्यात आली असून, निवड समिती सदस्य म्हणून श्री. दत्ता शिंदे, श्री. लक्ष्मण विटकर, श्री. सचिन गंगावणे, श्री. मोहन निंबाळकर व श्री. दगडू पवार यांचा समावेश करण्यात आला आहे. नवीन अध्यक्ष व कार्यकारिणीच्या नेतृत्वाखाली भैरव क्रांती शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे हे शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी व वंचित घटकांच्या मुलांसाठी अधिक प्रभावीपणे कार्य करेल, असा विश्वास संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आला.




### तेलंगणा मधील महात्मा फुले पुतळा विटंबनेचा पुण्यात निषेध

पुणे (दैनिक संध्या) : क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या पुतळ्याच्या विटंबनेचा निषेध असो... क्रूर समाजकंटकांना शिक्षा झालीच पाहिजे... महात्मा ज्योतिबा फुले यांचा विजय असो... अशा घोषणा देत माळी महासंघ पुणे शहर च्या वतीने माळी समाज बांधव आणि फुले प्रेमींनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निषेध आंदोलन केले. तेलंगणा राज्यात महात्मा फुले यांच्या पुतळ्याच्या विटंबनेचा जाहीर निषेध यावेळी करण्यात आला. यावेळी माळी महासंघ पुणे शहर अध्यक्ष दिपक जगताप, महिला अध्यक्ष स्मिता लडकत, नाना कुदळे, बाळासाहेब लडकत, सोमनाथ बटवाल, यशोधन आखाडे, चांगदेव पिंगळे ,शशिकला ढोले पाटील, राजेंद्र लडकत, प्रज्वल बनकर, रीमाताई लडकत, गिरीश झगडे, रवी सहाणे, प्रतिभा झगडे विजय कोठावळे, अभिजीत भुजबळ, शांता ताई नेवसे, मारुती भुजबळ, सारंग राऊत गणेश वाडकर यांसह समाजबांधव, भगिनी व फुले प्रेमी उपस्थित होते. तेलंगणा राज्यातील संगारेड्डी जिल्ह्यातील तेल्लापुर गावात क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या पुतळ्यावर समाजकंटकांनी हल्ला करून केलेल्या विटंबनेची घटना घडली. ही घटना निंदनीय असून या हीन कृत्याचा आणि यात सहभागी समाजकंटकांचा तीव्र निषेध यावेळी करण्यात आला. ही फक्त जोतिबांच्या पुतळ्याची विटंबना नाही, तर आपल्या सामाजिक विचारांवर आणि समतेच्या मूल्यांवर केलेला आघात आहे. अशा मनोविकृत लोकांचा जाहीर निषेध करण्यासाठी माळी महासंघ पुणे शहराच्या वतीने करण्याकरिता निषेध आंदोलन करण्यात आले.

# शोकछायेतच बारामतीत राष्ट्रवादीचे निर्भेळ यश

पुणे (दै. संध्या) :



राज्यातील राजकारणाला अंतर्मुख करणाऱ्या दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाची खोल छाया सोमवारी (ता. ९) बारामती येथील मतमोजणी केंद्रावर स्पष्टपणे जाणवत होती. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या निकालाने राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना यश मिळाले असले, तरी या विजयावर आनंदाचा जल्लोष नव्हता, तर अजितदादांच्या आठवणींनी गहिवरलेले मन होते.

बारामती मतमोजणी केंद्रातून विजयी उमेदवार बाहेर पडत असताना नेहमीचा उत्साह, गुलाल, फटाके किंवा घोषणाबाजी कुठेही दिसली नाही. उलट डोळ्यांत अश्रू, हातात हात, आणि मनात एकच पोकळी अजितदादांची अनुपस्थिती. दिवंगत अजितदादांच्या नेतृत्वाखाली आजवर पुणे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून झालेला सर्वांगीण विकास आजच्या मतमोजणी निकालातून स्पष्ट होत आहे, दादांच्या प्रति समर्पित केलेले हे प्रचंड मतांचे आकडे पुढे येत आहेत, अशी प्रतिक्रिया जिल्हाध्यक्ष संभाजी होळकर यांनी दिली. बारामती हा अजित पवार यांचा अनेक वर्षे राजकीय गड मानला जातो. इथल्या प्रत्येक कार्यकर्त्याच्या जडणघडणीत त्यांचा वाटा होता. त्यामुळेच आजचा विजय साजरा करण्याऐवजी अनेकांनी तो शांतपणे स्वीकारला. मतमोजणी केंद्रावर उपस्थित असलेले कार्यकर्ते, कर्मचारी आणि पत्रकार यांच्यातही एक प्रकारची स्तब्धता होती. कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी उपस्थित असलेले अप्पर पोलिस अधीक्षक गणेश बिरादार यांच्यासह पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी हे देखील शांतपणे बसून होते. जिल्हा परिषद सुपा गटातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या पल्लवी प्रमोद खेत्रे यांनी विजय मिळवला. निकाल जाहीर झाल्यानंतर त्यांच्या डोळ्यांत आनंदापेक्षा अश्रू अधिक होते. "दादांनी दिलेल्या संस्कारांचा हा कौल आहे," असे त्या म्हणाल्या. बारामती पंचायत समिती सुपा गणातून राष्ट्रवादी काँग्रेस व भाजप पुरस्कृत उज्ज्वला पोपट खैरे, कान्हाटी गणातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या श्यामल सुनील वाबळे, तर गुणवडी गणातून शुभांगी सुनील आगवणे यांनी विजय मिळवला. जिल्हा परिषद गुणवडी गटातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या शुभांगी कचेरे शिंदे, शिर्सुफळ गणातून राष्ट्रवादी काँग्रेस व भाजप पुरस्कृत अनिकेत प्रभाकर गावडे, पणदरे गटाचे विजयी उमेदवार मंगेश जगताप यांच्यासह अनेकांनी एकमुखाने भावना व्यक्त केल्या की, "आजचा विजय साजरा करण्याचा नाही, तर अजितदादांच्या आठवणी जपण्याचा दिवस आहे." अनेकांनी अजित पवार यांच्या प्रतिमेसमोर नतमस्तक होत विजय स्वीकारला.

> बारामतीच्या राजकीय इतिहासात ही मतमोजणी आनंदाच्या जल्लोषासाठी नव्हे, तर भावनांच्या ओलाव्यासाठी लक्षात राहील. सत्ता, आकडे आणि पदे क्षणिक असतात; पण नेतृत्व, नातेसंबंध आणि माणुसकी कायम राहते, हे आजच्या शोकाकूल वातावरणातून प्रकर्षाने दिसून आले.
> **- किरण तावरे, विजयी उमेदवार, बारामती पंचायत समिती (सांगवी)**

## मदतीसाठी आलेल्या 'त्या'तरुणीचा पोलिस चौकीतच सौदा?

पुणे (दै. संध्या) :

पुण्यातील फरासखाना पोलिस ठाण्यात घडलेल्या एका धक्कादायक प्रकारामुळे पोलिस दलाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मदतीसाठी स्वतः पोलिस ठाण्यात आलेल्या एका बांगलादेशी तरुणीला पुन्हा जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करवून घेणाऱ्या कुंटणखाना मालकिणीच्या ताब्यात दिल्याचा आरोप महिला पोलिस कर्मचाऱ्यावर झाला असून संबंधित महिला पोलिस हवालदाराला निलंबित करण्यात आले आहे. याप्रकरणी अधिक माहिती अशी की, सुमारे महिनाभरापूर्वी रात्रीच्या वेळी एक तरुणी फरासखाना पोलिस ठाण्यात आली होती. तिने कर्तव्यावर असलेल्या महिला पोलिस हवालदाराला आपण बांगलादेशी नागरिक असून बुधवार पेठ परिसरात आपल्याकडून जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करून घेतला जात असल्याची माहिती दिली. तसेच आपली सुटका करून मदत करण्याची विनंतीही तिने केली.

## अखिल हिंदू साहित्य संमेलनाच्या आयोजनासाठी पुण्यात नियोजन बैठक संपन्न

महाराष्ट्रातून ७० प्रमुख प्रतिनिधींची उपस्थिती ; एप्रिल २०२६ मध्ये होणार अखिल हिंदू साहित्य संमेलन

पुणे (दै. संध्या) :

अखिल हिंदू साहित्य संमेलनाच्या आयोजनाच्या दृष्टीने पुण्यात एक महत्त्वाची नियोजन बैठक सदाशिव पेठेतील पेरूगेट येथील भावे हायस्कूलच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीचे अध्यक्षपद कैलासनाथ नंदा यांनी भूषविले. बैठकीस संपूर्ण महाराष्ट्रातून विविध संघटनांचे सुमारे ७० प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत अखिल हिंदू साहित्य संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी १५ प्रमुख समित्यांची रचना करण्यात आली असून, प्रत्येक समितीत ७





ते ८ प्रमुख कार्यकर्त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नियोजन प्रक्रियेत हिंदू नेटवर्कचे सुनील सोनवणे, प्रा. डॉ.संजय भांडारकर, स्वातंत्र्यवीर सामाजिक संस्थेचे श्रीनिवास कुलकर्णी, विश्व हिंदू परिषदेच्या धार्मिक विभागाचे संजय मुरदाळे, सक्रियपणे सहभागी झाले होते. बैठकीत संमेलनाच्या कार्यक्रम रचनेवर सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रस्तावित अखिल हिंदू साहित्य संमेलनात ग्रंथ दिंडी, कवी कट्टा, हिंदू साहित्यावर आधारित व्याख्याने, धर्मविचार मांडणारे परिसंवाद, तसेच पारंपरिक वाद्य व कला सादरीकरण यांचा समावेश असणार आहे. यासोबतच काही विशेष प्रकट मुलाखतीही घेण्यात येणार आहेत. तसेच हिंदू धर्मासाठी जागरणात्मक व निःस्वार्थ कार्य करणाऱ्या विशेष व्यक्तींना संमेलनात "हिंदू तेज पुरस्कार" देऊन सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# 'झी'तर्फे मारुती सुझुकी प्रस्तुत २४वे झी सिने अ‍ॅवॉर्ड्स २०२६ ची घोषणा

पुणे (दै. संध्या) :

भारतातील अग्रगण्य कंटेंट आणि टेक्नॉलॉजी पॉवरहाऊस 'झी'ने देशाच्या मनोरंजन विश्वाला आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली असून, कथाकथनाच्या आणि त्या अनुभवण्याच्या पद्धतींना सातत्याने नवे रूप दिले आहे. संस्कृतीत रुजलेल्या आणि भविष्यासाठी सज्ज अशा भावनिकदृष्ट्या प्रभावी कथाकथनाला अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत, विभिन्न स्क्रीन्स, स्वरूपे आणि भाषांमधून समृद्ध व अनुभवात्मक मनोरंजन घडवण्यावर कंपनीचा भर आहे. अनेक दशकांच्या कथाकथनाच्या अनुभवाच्या जोरावर हे नेटवर्क विविध प्लॅटफॉर्म्सवर प्रेक्षकांशी असलेला संवाद सातत्याने




अधिक विकसित करत असून प्रेक्षकांशी अधिक खोल आणि अर्थपूर्ण नाते निर्माण करत आहे.

या परंपरेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ म्हणून झी सिने अ‍ॅवॉर्ड्सचा यात समावेश होतो, जो हिंदी चित्रपटसृष्टीतील उत्कृष्टतेचा गौरव करणारे विश्वासार्ह आणि मानाचे व्यासपीठ म्हणून ओळखले जाते. वर्षानुवर्षे हा सोहळा केवळ उद्योगातील यशाचेच नव्हे, तर चित्रपट आणि प्रेक्षकांमधील दृढ नात्याचेही प्रतिबिंब ठरला असून, सिनेमाचे खरे शिलेदार म्हणून चाहत्यांना मान्यता देणारा हा एक अत्यंत लोकप्रिय उत्सव बनला आहे.

यावर्षी 'झी' आपली प्रेक्षकांना प्रथम ठेवणारी 'फॅन्टर्टेनमेंट' ही संकल्पना 'यह पल है फॅन्स का' या पुढील टप्प्यासह एका नवीन उंचीवर घेऊन जात आहे. चाहत्यांच्या प्रेम, निष्ठा आणि उत्कटतेतूनच सिनेमातील सर्वात अविस्मरणीय क्षण घडतात या विश्वासाला ही संकल्पना अधिक बळ देते. मारुती सुझुकी प्रस्तुत 24वे झी सिने अ‍ॅवॉर्ड्स 2026 या सत्याचा उत्सव साजरा करत, कलाकार आणि त्यांच्या सर्वांत मोठ्या चाहत्यांमध्ये प्रत्येक क्षण सामायिक अनुभव बनवत आहेत.

मुंबईत झालेल्या उत्साही आणि चाहत्यांच्या सहभागातून साकारलेल्या पत्रकार परिषदेत 2026 आवृत्तीची अधिकृत घोषणा करण्यात आली. या वेळी बॉलिवूड सुपरस्टार्स अक्षय कुमार, तमन्ना भाटिया, जॅकलिन फर्नांडिस, सोनम बाजवा, अपारशक्ती खुराणा, मिथून आणि पलक मुच्छल यांनी एक येऊन या रोमांचक नव्या पर्वाची सुरुवात केली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला आपुलकी, स्टार पॉवर आणि प्रेक्षकांशी जोडलेपणाची भावना लाभली, ज्यामुळे चाहत्यांच्या नजरेतून सिनेमा साजरा करणाऱ्या या पर्वाची दिशा ठरली. ही घोषणा केवळ पाहण्याचा क्षण न राहता, चाहत्यांनी स्वतः घडवलेला एक अनुभव ठरला आणि त्यामुळे चाहते केवळ साक्षीदार न बनता त्या क्षणांचे खरे शिल्पकार बनले.

'यह पल है फॅन्स का' या संकल्पनेच्या भावनेशी प्रामाणिक राहून ही घोषणा एक पूर्णपणे अनुभवात्मक स्वरूपात साकार झाली, जिथे चाहत्यांनी केवळ तो क्षण पाहिला नाही, तर तो स्वतः घडवला. सुपरस्टार अक्षय कुमार यांनी थेट चाहत्यांशी संवाद साधत सर्व कलाकारांना मंचावर आमंत्रित केले आणि क्षणातच संपूर्ण वातावरणात उत्सवाची शोभा वाढवत, मारुती सुझुकी प्रस्तुत 24वे झी सिने अ‍ॅवॉर्ड्स 2026 च्या ग्राउंड इव्हेंटच्या तारखा जाहीर केल्या आणि हा एक सामूहिक आणि संस्मरणीय जल्लोषमय क्षण ठरला.

# क्वालकॉम जागतिक इंजिनियरिंग कार्यप्रणालीत भारताची महत्त्वाची भूमिका अधिक सशक्त करत आहे

पुणे (दै. संध्या) :

क्वालकॉम टेक्नॉलॉजीज इंक ने आज आपल्या २ एनएम सेमीकंडक्टर डिझाईनच्या यशस्वी टेप-आउटची घोषणा केली. प्रगत सेमीकंडक्टर डिझाईन क्षेत्रातील ही एक महत्त्वाची घडामोड असून ती भारताच्या झपाट्याने वाढणाऱ्या सेमीकंडक्टर ईकोसिस्टमला पाठबळ देण्याच्या कंपनीच्या वचनबद्धतेस बळकटी देते. ही सिद्धी बंगळूर, चेन्नई आणि हैदराबादेतील इंजिनियरिंग विकास केंद्रांच्या साथीने क्वालकॉमच्या जागतिक इंजिनियरिंग क्षमतांची ताकद दर्शविते. ही केंद्रे जागतिक स्तरावर कंपनीच्या सर्वात प्रगत आणि कुशल विकास केंद्रांपैकी आहेत, तसेच अमेरिकेच्या बाहेरील, कंपनीचा सर्वात मोठा इंजिनियर्सचा कर्मचारीवर्ग येथे कार्यरत आहे.



हा टप्पा अत्याधुनिक सेमीकंडक्टर विकासासाठीचे महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून भारताचा उदय झाल्याचे अधोरेखित करतो आणि देशाच्या सेमीकंडक्टर क्षेत्राच्या उभारणीत आणि प्रगतीत क्वालकॉमची दीर्घकालीन गुंतवणूक दशवितो. केंद्रीय रेल्वे; माहिती आणि प्रसारण; व इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री श्री. अश्विनी वैष्णव यांच्या भेटीदरम्यान क्वालकॉमच्या बंगळूर सुविधेत ही सिद्धी सादर करण्यात आली. त्यांच्या उपस्थितीमुळे जागतिक सेमीकंडक्टर इनोव्हेशनमध्ये भारताचे वाढते महत्त्व आणि ही प्रगती पुढे नेण्यात क्वालकॉमची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित झाली. तसेच आपल्या देशात चिप डिझाईन क्षमतांना बळकटी देण्यासाठी आणि स्वदेशी सेमीकंडक्टर प्रतिभा घडवण्यासाठी सरकारकडून राबवण्यात येणारे सातत्यपूर्ण आणि ईकोसिस्टम-प्रेरित प्रयत्न देखील यामधून दिसून आले.

भारतात क्वालकॉमची उपस्थिती 20 पेक्षा जास्त वर्षांपासून निरंतर गुंतवणुकीच्या स्वरूपात आहे. या काळात कंपनीने अमेरिकेबाहेर आपली ही अत्यंत मोठी इंजिनियरिंग विकास क्षमता उभारली आहे. वायरलेस, कम्प्युट, एआय आणि सिस्टम-स्तरीय इंजिनियरिंगमधील सखोल क्षमतांसह, क्वालकॉम भारताच्या टेक्नॉलॉजी विकास आणि इनोव्हेशन प्रवासाबाबतची आपली दीर्घकालीन वचनबद्धता बळकट करत आहे.

२ एनएम च्या यशस्वी टेप-आउटने ही वचनबद्धता अधिक दृढ करत जागतिक सेमीकंडक्टर इनोव्हेशनला आकार देण्यातील भारताची व्यापक होत चाललेली भूमिका अधोरेखित केली आहे. भारतातील क्वालकॉम टेक्नॉलॉजीजच्या इंजिनियरिंग टीम्स डिझाईनची अंमलबजावणी, त्यांची ग्राह्यता, एआय ऑप्टिमायझेशन, सिस्टम इंटिग्रेशन वगैरे विविध क्षेत्रांमध्ये योगदान देतात तसेच त्या क्वालकॉमच्या जागतिक टीम्सद्वारे व्याख्यायित करण्यात आलेल्या आर्किटेक्चर आणि प्लॅटफॉर्म्सच्या ऑप्टिमायझेशनमध्ये मदत करतात, जे जगभरातील अब्जावधी लोक वापरत असलेल्या प्लॅटफॉर्म्स आणि उत्पादनांना शक्ती देतात. ही सिद्धी भारताच्या सेमीकंडक्टर ईकोसिस्टमला पुढे नेण्याच्या क्वालकॉमच्या वचनबद्धतेची पुन्हा एकदा पुष्टी करते आणि जागतिक सेमीकंडक्टर केंद्र बनण्याच्या देशाच्या महत्त्वाकांक्षेला आधार देते. केंद्रीय रेल्वे; माहिती आणि प्रसारण; व इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री श्री. अश्विनी वैष्णव म्हणाले, भविष्यासाठीच्या प्रगत सेमीकंडक्टर टेक्नॉलॉजीच्या डिझाईनमध्ये भारत सातत्याने मध्यवर्ती भूमिका बजावत आहे. क्वालकॉमचे येथील कार्य पाहता, त्यांची अभियांत्रिकी ताकद, सखोल डिझाईन क्षमता आणि भारताशी असलेली प्रदीर्घ निष्ठा खरोखर लक्षवेधी आहे. यासारख्या सिद्धीमधून हे दिसून येते की, भारताच्या डिझाईन ईकोसिस्टमने किती प्रगती केली आहे आणि एक जागतिक स्पर्धात्मक सेमीकंडक्टर उद्योग उभारण्याच्या आमच्या व्हिजनशी ती किती सुसंगत आहे.

इंडिया सेमीकंडक्टर मिशनचे आणि इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव श्री. अमितेश कुमार सिन्हा म्हणाले, भारताचे सेमीकंडक्टर मिशन जबरदस्त वेगाने प्रगती करत असून त्याला मजबूत डिझाईन ईकोसिस्टम तसेच उद्योगाच्या निरंतर सहभागाचे पाठबळ आहे. देशात दीर्घकालीन सेमीकंडक्टर क्षमता उभारण्यासाठी प्रगत इंजिनियरिंग आणि R&D क्षमतांमधील गुंतवणूक महत्त्वाची आहे. भारताबाबतची क्वालकॉमची दीर्घकालीन वचनबद्धता भारताच्या सेमीकंडक्टर डिझाईन ईकोसिस्टमची वाढती सखोलता दर्शविते आणि सेमीकंडक्टर इनोव्हेशनसाठी जागतिक स्पर्धात्मक केंद्र बनण्याच्या भारताच्या व्यापक महत्त्वाकांक्षेत योगदान देते. क्वालकॉम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे सीनियर व्हाईस प्रेसिडेंट, इंजिनियरिंग श्री. श्रीनी मादली म्हणाले, "ही सिद्धी भारतातील आमच्या इंजिनियरिंग टीम्सची ताकद आणि सखोलता यांची साक्ष देते. प्रगत सेमीकंडक्टर डिझाईनवरील जागतिक प्रोग्राम आणि आर्किटेक्चर टीम्ससोबत जवळून काम करण्यासाठी उत्कृष्ट प्रतिभेची आवश्यकता असते आणि आमच्या भारतीय टीम्स सातत्याने जागतिक मानकांनुसार कामगिरी करत आहेत. आम्ही महत्त्वाकांक्षी डिजिटल परिवर्तन प्रवासाला चालना देणाऱ्या देश-विदेशातील अनेक हित धारकांसोबत काम करत आहोत. भारत हा आमच्या जागतिक इंजिनियरिंग रोडमॅपमधील एक अविभाज्य भाग आहे आणि प्रस्तुत सिद्धीमधून आमच्या इथल्या इंजिनियरिंग कर्मचाऱ्यांच्या असामान्य क्षमता आणि प्रभाव स्पष्ट झाला आहे." क्वालकॉम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे सीनियर व्हाईस प्रेसिडेंट, इंजिनियरिंग श्री. शशी रेड्डी म्हणाले, "क्वालकॉमची भारतातील संशोधन आणि विकास केंद्रे आर्किटेक्चरपासून ते अंमलबजावणी तसेच सॉफ्टवेअर प्लॅटफॉर्म्स आणि यूज-केस ऑप्टिमायझेशनपर्यंत सिस्टम डिझाईनच्या विविध स्तरांवर योगदान देत आहेत. या एआय च्या युगात, आम्ही क्वालकॉमच्या जागतिक प्रोग्राम्सचा एक भाग म्हणून रियल-वर्ल्ड यूज केसेसच्या विकासाला आणि ऑप्टिमायझेशनला समर्थन देतो. या सिद्धीमधून हे प्रतिबिंबित होते की, भारताची इंजिनियरिंग प्रतिभा कशाप्रकारे इनोव्हेशनला चालना देण्यास मदत करत आहे." क्वालकॉम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे व्हाईस प्रेसिडेंट, इंजिनियरिंग श्री. महेश मूर्ती म्हणाले, "कनेक्टिव्हिटी हा विविध उद्योगांमध्ये होत असलेल्या परिवर्तनाचा पाया आहे. भारतातील आमच्या टीम्स आमच्या जागतिक इंजिनियरिंग मॉडेलमध्ये हार्डवेअर, सॉफ्टवेअर आणि बुद्धिमान कनेक्टेड सिस्टम्सच्या या समन्वयास पुढे नेण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. आम्ही अशा प्लॅटफॉर्म्सच्या विकासाला पाठबळ देत आहोत, जे निर्बाध, उच्च-कार्यक्षमतेचा कनेक्टेड अनुभव प्रदान करतात आणि डिजिटल परिवर्तनाची पुढील लाट सक्षम करतात."

> क्वालकॉम इंडियाचे अध्यक्ष सावी सोईन म्हणाले, ही लक्षणीय सिद्धी भारताप्रती क्वालकॉमच्या दोन दशकांपेक्षा जास्त कालावधीच्या बांधिलकीचे प्रतिबिंब आहे, ज्यामध्ये प्रतिभेत गुंतवणूक, प्रगत इंजिनियरिंग क्षमतांची उभारणी आणि अशा प्रमाणात संचालन करणे समाविष्ट आहे, जे आमच्या हितधारकांना त्यांच्या डिजिटल परिवर्तनाच्या प्रवासात पाठबळ देण्यास सक्षम करते. जगासाठी पुढील पिढीच्या टेक्नॉलॉजीचे डिझाईन, विकास आणि वितरणात आम्ही कशा प्रकारे समर्थन देतो, यात भारताची महत्त्वाची भूमिका आहे. येथे विकसित होत असलेले इनोव्हेशन जागतिक स्तरावर कनेक्टिव्हिटी, कम्प्युटेशन आणि इंटेलिजन्ट सिस्टम्सच्या भवितव्याची जडणघडण करण्यात मदतरूप होत आहे." क्वालकॉमचे बंगळूर कॅम्पस पुढील पिढीच्या वायरलेस, एआय, कम्प्युट आणि सिस्टम-स्तरीय टेक्नॉलॉजीच्या विकासासाठीचे एक प्रमुख इंजिनियरिंग केंद्र म्हणून काम करत आहे. देशाच्या व्यापक सेमीकंडक्टर आणि टेक्नॉलॉजीविषयक महत्त्वाकांक्षेशी सुसंगत असलेल्या अलीकडच्या सिद्धीद्वारे क्वालकॉमची जगासाठी भारतात निर्मिती करण्याची दीर्घकालीन बांधिलकी आणखी दृढ होत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### पाणी, कचरा समस्या सोडवून वाहतूक कोंडी मार्गी लावू - महेंद्रशेठ मेदनकर



चाकण (दैनिक संध्या) : चाकण - शिक्रापूर या रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामाला मुहूर्त मिळाला ही कौतुकास्पद बाब असून, हे काम तातडीने आणि युद्ध पातळीवर सुरू व्हावे, आणि या मार्गावरील वाहतूक कोंडी कमी व्हावी, त्यासाठी मी प्रयत्नशील राहणार आहे. पाणी, कचरा समस्या सोडवून, पर्यावरण वाढीसाठी पुढाकार घेणार असल्याचा निर्धार खेड पंचायत समितीचे नवनिर्वाचित सदस्य महेंद्रशेठ मेदनकर यांनी केला आहे. महेंद्रशेठ यांनी सांगितले की, " वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी आणि प्रवास अतिजलद होण्यासाठी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा महामंडळाने अर्थात एमएसआयडीसीने पुणे जिल्ह्यात दोन रस्ते प्रकल्प हाती घेतले आहेत. चाकण, तळेगाव व शिक्रापूर या दरम्यानच्या महामार्गावर वाहनांची संख्या मागील काही वर्षात प्रचंड वाढली आहे. तळेगावसह चाकण औद्योगिक वसाहतीत याच मार्गाने अवजड वाहने येत असल्याने व रुंदीकरणाचे काम रखडल्याने या महामार्गावरचा वाहतुकीचा ताण प्रचंड वाढला आहे. या कोंडीतून आता सुटका होण्यासाठी मी स्वतः प्रयत्न करणार आहे. चाकण, मेदनकरवाडी, कडाचीवाडी, रासे, काळुस या दरम्यान रस्त्यालगत पडलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी पुढाकार घेणार असून, नागरिकांनी रस्त्यालगत कचरा टाकू नये व इतरांना त्यापासून त्रास होऊ नये असे आव्हान करणार आहे." पाणी, कचरा, विज, वाहतूक कोंडी या समस्या मार्गी लावण्याबरोबच या भागातील बेरोजगार तरुणांना नोकऱ्या मिळवून देण्यासाठी आतापर्यंत प्रयत्न केले आहेत. काम करत आलोय काम करत राहू. इथून पुढेही गरजूंना नोकऱ्या देण्यासाठी प्रयत्न करणार असून, सर्वसामान्य नागरिकांना दिलासा आणि न्याय देण्याची आमची भूमिका राहील, असे मेदनकर यांनी आवर्जून सांगितले.

### दादांच्या अविरत परिश्रमांना जनतेने कृतज्ञतापूर्वक अर्पण केली आदरांजली

मुंबई (दैनिक संध्या) : जाहीर झालेले जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीचे निकाल म्हणजे राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री व आमचे नेते अजितदादा पवार यांच्या कार्याला आणि त्यांच्या अविरत परिश्रमांना जनतेने कृतज्ञतापूर्वक अर्पण केलेली आदरांजली आहे अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. अजितदादांनी आयुष्यभर तळागाळातील माणसासाठी झटत विकासाला गती दिली. आजचा हा निकाल म्हणजे त्यांच्या विचारांवरील, त्यांच्या नेतृत्वावरील अढळ श्रद्धेची साक्ष आहे. या माध्यमातून दादांचा वारसा जपत अधिक जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे जनतेची सेवा करण्याचा आमचा संकल्प अधिक दृढ झाला आहे असेही सुनील तटकरे यांनी 'एक्स' वर म्हटले आहे.

# दोन जिल्हा परिषदांमध्ये काँग्रेसची सत्ता तर दोन ठिकाणी सत्तेत सहभागी

## हर्षवर्धन सपकाळ : स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत काँग्रेसचा विचार व संघटन विस्तारासाठी स्वबळावर लढलो



मुंबई (दै. संध्या) :

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका काँग्रेसचा विचार व संघटनेचा विस्तार करण्यासाठी स्वबळावर लढवल्या. काही ठिकाणी राजकीय परिस्थिती पाहून स्थानिक पातळीवर युती वा आघाडी करण्यात आली होती. या कार्यकर्त्यांच्या निवडणुका असल्याने त्यांना जास्तीत जास्त संधी दिली पाहिजे, जे की आघाडी केल्यानं मिळू शकत नाही. जनतेने या निवडणुकीत काँग्रेस विचाराला चांगला कौल दिला असल्याचे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निकालावर बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, २०१९ साली राज्यातील एका विशिष्ट परिस्थितीत महाविकास आघाडी स्थापन करून सरकार स्थापन करण्यात आले होते, त्यानंतर २०२४ च्या विधानसभा मविआ म्हणून लढलो तर लोकसभेसाठी देशभरात भाजपाविरोधात संविधानवादी पक्षांची इंडिया आघाडी स्थापन करण्यात आली, पण स्थानिक स्वराज्यच्या निवडणुकीत मात्र अनेक ठिकाणी स्वबळावर लढलो. वंचित बहुजन आघाडी, ओबीसी बहुजन आघाडी व रासप हे नवे मित्रपक्ष काँग्रेस पक्षाने जोडले. या निवडणुकीत राज्यातील सर्वात मोठा विरोधी पक्ष काँग्रेस ठरला आहे. २०२९ ला अद्याप वेळ आहे, त्यावेळची राजकीय परिस्थिती पाहून निर्णय घेऊ असे सपकाळ म्हणाले.

चंद्रपूर महानगरपालिकेसंदर्भात बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, काँग्रेस पक्षाकडे ३२ चा आकडा आहे व २ सदस्यांची गरज आहे. चंद्रपुरात शिवसेना (उबाठा), वंचित बहुजन आघाडीने गट स्थापन केला आहे, त्यांनी काँग्रेसला पाठिंबा द्यावा यासाठी प्रयत्न सुरु असून उबाठा बरोबर चर्चा झालेली आहे व तसा प्रस्ताव दिलेला आहे. परभणी महानगरपालिकेत शिवसेना (उबाठा) ला काँग्रेसच्या पाठिंब्याची गरज आहे आणि जे होईल ते दोन्ही ठिकाणी होईल, असे सपकाळ यांनी स्पष्ट केले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघातात झालेल्या मृत्यूने अनेकांच्या मनात आजही संशय आहे. अपघाताला १० दिवस झाले तरी अनेक प्रश्नांची उत्तरे मिळालेली नाहीत, त्यामुळे संशय बळावणे स्वाभाविक आहे. दृष्यमानता नसल्याने विमान अपघात झाल्याचे सांगितले जात होते पण त्यानंतर अनेक बाबी समोर येत आहेत पण मुख्यमंत्री फडणवीस या अपघाताकडे गांभिर्याने पहात नाहीत असे दिसते, असे सपकाळ म्हणाले. जिल्हा परिषद निवडणुकीत सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ येथे एका धाब्यावर ईव्हीएम मशीन सापडल्याचे सर्वांनी पाहिले पण अशा किती मशीन मंत्र्यांच्या, सत्ताधारी नेत्यांच्या घरी आढळल्या याची माहिती घ्या. या निवडणुकीत ही अनेक ठिकाणी ईव्हीएम मशिनच्या तक्रारी आल्या आहेत.

सरसंघचालक मोहन भागवत यांच्या विधानावर बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, भाजपाचे माजी अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी भाजपाला संघाची आवश्यकता नाही असे म्हटले होते, त्याला भागवत यांनी प्रत्युत्तर दिले असेल. कोणाला, कोणाची गरज आहे हे भाजपा व रा. स्व. संघाने आपसात ठरवावे असा टोला सपकाळ यांनी लगावला.

सीटीईटी परिक्षेवेळी परिक्षार्थींना मंगळसुत्र काढण्यास लावणे हे अत्यंत आक्षेपार्ह आहे. हा प्रकार पहिल्यांदाच घडला असून ऐकावे ते नवलच आहे. कॉपीचा व मंगळसुत्राचा काय संबंध आहे, असा प्रश्न उपस्थित करून भाजपा सरकार आता धर्मबुडवेपणा करायला लागले आहे, असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

### नरेंद्र पाटलांच्या पत्नी प्राची पाटलांचा पराभव

सातारा (दै. संध्या) :

सातारा जिल्हा परिषदेच्या ६५ जागांसाठी निवडणूक झाली. आज (९ जानेवारी) निकाल जाहीर झाले. यात मंद्रुळकोळे जिल्हा परिषद गटात माथाडी कामगार नेते नरेंद्र पाटील यांना झटका बसला. नरेंद्र पाटील यांच्या पत्नी प्राची पाटील यांचा पराभव झाला. शिंदेसेनेकडून निवडणूक लढवत असलेल्या २२ वर्षीय मृणाल पाटील यांनी विजयाचा गुलाल उधळला. माथाडी कामगार नेते नरेंद्र पाटील यांच्या पत्नी प्राची पाटील या भाजपाकडून निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या होत्या. शिंदेसेनेचे मंत्री शंभूराज देसाई यांनी पाटण तालुक्यात ताकद पणाला लावली होती. पाटण तालुक्यातच मंद्रुळकोळे जिल्हा परिषद गटातून शिंदेसेनेने मृणाल पाटील यांना उमेदवारी दिली होती. सातारा जिल्ह्यात सर्वात कमी वय असलेल्या सदस्या म्हणून मृणाल पाटील विजयी झाल्या आहेत. भाजपाचे मंत्री जयकुमार गोरे यांनी शंभूराज देसाई यांच्या विरोधात पाटण तालुक्यात आक्रमक प्रचार केला होता.

### जि.प.ला राष्ट्रवादी कॉंग्रेस तर प.सं. शिवसेना (शिंदे) यांचे वर्चस्व

नारायणगाव (दै. संध्या) :

जुन्नर तालुक्यात लक्षवेधी ठरलेल्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत ८ पैकी ४ जागांवर राष्ट्रवादी काँग्रेस, ३ जागांवर शिवसेना (शिंदे) व १ जागेवर शिवसेना (ठाकरे) यांनी यश मिळवले तर पंचायत समितीच्या १६ गणा मध्ये शिवसेना (शिंदे) ८ जागा, राष्ट्रवादी काँग्रेस ६ जागा, शिवसेना ( ठाकरे ) आणि भाजपाला प्रत्येकी १ जागेवर समाधान मानावे लागले. जुन्नर तालुक्यात जिल्हा परिषदेत राष्ट्रवादीचे वर्चस्व तर जुन्नर पंचायत समितीत शिवसेना (शिंदे) यांचे वर्चस्व आले आहे. या निवडणुकीत भाजपा नेत्या, माजी जिल्हा परिषद सदस्या आशाताई बुचके, माजी जिल्हा परिषद माऊली खंडागळे यांच्या पत्नी जयश्री खंडागळे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष पांडुरंग पवार यांच्या स्नुषा कविता पवार , आमदार शरद सोनवणे यांचे विश्वासू सहकारी संतोष चव्हाण यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे. निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना ( ठाकरे ) यांच्यात आघाडी झाली होती . आघाडी नुसार आघाडीचे जिल्हा परिषदेत ५ जागा निवडून आलेल्या आहेत . तर पंचायत समिती मध्ये ६ राष्ट्रवादी ( अजित पवार ) जागा आलेल्या आहेत . शिवसेना ( ठाकरे) आणि भाजपाला प्रत्येकी १ जागा आहे. शिवसेना (शिंदे) ८ जागा असल्याने त्यांना बहुमतासाठी १ जागा आवश्यक आहे.

शिवसेना ( ठाकरे ) आणि भाजपाला प्रत्येकी १ सदस्य असल्याने शिवसेना कोणाला गळाला लावणार याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.



# राजगुरुनगर पंचायत समितीवर आमदार बाबाजी काळे यांनी मारली बाजी

राजगुरुनगर (दै. संध्या) :



खेड पंचायत समिती साठी सोळा पैकी नऊ गणातून शिवसेनेचे उमेदवार निवडून आल्याने पंचायत समितीवर आमदार बाबाजी काळे यांनी एकहाती सत्ता मिळविली असून राष्ट्रवादी काँग्रेसला सहा आणि शिंदे शिवसेनेला एक जागा मिळाली आहे.खेड तालुक्यातील जिल्हापरिषद व पंचायत समिती साठी विद्यमान आमदार बाबाजी काळे यांचा शिवसेना पक्ष व माजी आमदार दिलीप मोहिते यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्यात प्रमुख लढत झाली.

अत्यंत चुरशीच्या झालेल्या लढतीत खेड पंचायत समितीवर विद्यमान आमदार बाबाजी काळे यांच्या शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाने प्रथमच एक हाती भगवा फडकाविला.

पंचायत समिती गणातून निवडून आलेले उमेदवार

१) (वाफगाव)ज्ञानेश्वर हनुमंत ढेरेंगे (मशाल)मिळालेली मते ८३४६
२) कडूस,शंकर रघुनाथ कावडे (घड्याळ)७४२४
३) काळुस,मंगेश गुलाब सावंत(मशाल) ८३७०
४) आंबेठाण, श्रद्धा दत्तात्रय मांडेकर(घडयाळ)७३८५
५) म्हाळुंगे,अश्विनी सोमनाथ तरस (घडयाळ)९५४९
६) कुरुळी, गौरी चंदन मुऱ्हे (मशाल)५२१३
७) मेदनकर वाडी,महेंद्र अशोक मेदनकर(घडयाळ )६४४४
८) आळंदी,निखिल ज्ञानोबा थोरवे (. घडयाळ)७०७५
९) नाणेकरवाडी, रूपाली दीपक कांबळे (मशाल)४४०७
१०) चास, कविता वैभव राक्षे (मशाल) ७६६५
११) पिंपळगाव, विद्या सयाजी मोहिते (मशाल) ८९२९
१२) मरकळ प्रसाद अशोक घेनंद (मशाल) ६८९६
१३) पाईट, सारिका अर्जुन गोगावले (मशाल. )८८४२
१४) रेटवडी दिलीप राजाराम दुबे (मशाल) ६८४६
१५) वाडा, मनीषा गणेश हिले (शिंदे सेना)४४३६
१६) वाशेरे दिनेश चिंतामण हांडे (घड्याळ) ४७५२


## जाहीर नोटीस

**तमाम नागरीकांस विशेषतः गाव मौजे अष्टविनायक लेण्याद्री, ता. जुन्नर जि. पुणे येथील सर्व नागरीकांना सदरच्या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की,**

आमचे अशिलांनी खाली परीशिष्ठात नमुद केलेल्या मिळकती संदर्भात श्री. प्रशांत गजानन खत्री व माया प्रशांत खत्री, रा. जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे यांचेबरोबर व्यवहार केला असुन सदरची मिळकत आमचे अशिलांना विकत घ्यावयाची आहे. श्री. प्रशांत गजानन खत्री व माया प्रशांत खत्री यांनी ते खाली परीशिष्ठात नमुद केलेल्या मिळकतीचे कायदेशीर मालक असल्याची माहीती व जमिन प्रत्यक्ष ताबेवहीवाटीत असल्याची माहीती आमचे अशिलांना दिली आहे. आमचे अशिल त्यांचेबरोबर सदर जमिनीचा व्यवहार करु इच्छित आहेत. म्हणुन इतर कोणाची फसवणुक होऊ नये म्हणुन आमचे अशिल सदरची जाहीर नोटीस मुद्दामहून प्रसिध्द करीत आहेत.

खाली परीशिष्ठात नमुद केलेल्या मिळकतीसंदर्भात कोणताही करार, साठेखत, खरेदीखत, गहाण, दान, लीज, लीन, भाडेकरार, मुखत्यारपत्र, कुलमुखत्यारपत्र वगैरे तत्सम स्वरुपाचा कोणताही तबदीलीचा व्यवहार श्री. प्रशांत गजानन खत्री व माया प्रशांत खत्री यांचेबरोबर यापूर्वी कोणी केलेला असल्यास तसेच कोणाचाही सदर मिळकतीमध्ये हक्क हितसंबंध असल्यास, लेखी कागदपत्रांसह सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाचे आत खालील नमुद केलेल्या पत्यावर संपर्क साधुन खात्री पटवुन दयावी. सदरील वर नमुद केलेल्या मुदतीत खाली नमुद केलेल्या मिळकती संदर्भात कोणीही खात्री पटवुन दिली नाही अगर हरकत घेतली नाही तर आमचे अशिल श्री. प्रशांत गजानन खत्री व माया प्रशांत खत्री यांचेबरोबर व्यवहार करतील मग मात्र कोणाचीही, कोणतीही बाब ऐकुन घेतली जाणार नाही किंवा कोणाचाही काही हितसंबंध असल्यास तो त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिला आहे असे समजण्यात येईल व आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :**

तु. व जि. प. पुणे तालुका जुन्नर, पो.तु.ता जुन्नर, पं.स. जुन्नर पैकी ग्रामपंचायत **अष्टविनायक लेण्याद्री**, येथील व मे. दुय्यम निबंधक साो., जुन्नर यांचे हद्दीतील गांव **अष्टविनायक लेण्याद्री**, येथील श्री. प्रशांत गजानन खत्री व माया प्रशांत खत्री यांचे मालकी वहिवाटीची व आजरोजी त्यांची कायदेशीर स्वामीत्व असलेली तसेच त्यांचे ताबे-वहिवाटीस असलेली शेत जमीन

गांव मौजे अष्टविनायक लेण्याद्री येथील बिनशेती मिळकत

| गट नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| ५८/१/अ | ०.१९.३७ | १९६.७० |

येणेप्रमाणे बिनशेती जमीन तसेच जमीनीतील झाडा-झुडुपांसह वगैरे तद्भ्दुत वस्तुसह व हक्कासह तसेच सदर मिळकतीमध्ये जाणे-येणेचे वहीवाटीचे हक्कासह

येणेप्रमाणे नोटीस
दि. ०८/०२/२०२६

सही/-
श्री. पी.आर. लुंकड
ॲडव्होकेट
इंदिरा प्लाझा, शंकरपुरापेठ, जुन्नर, जि. पुणे.


### नागपुरात वीज दरांवर होणार जनसुनावणी

नागपूर (दै. संध्या) : महावितरणच्या वीजदर निर्धारण याचिकेबाबत मंगळवारी नागपुरात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाची जनसुनावणी आयोजित करण्यात आली आहे. आज, मंगळवारी सकाळी १०.३० वाजता जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात सुरू होणाऱ्या या जनसुनावणीत ग्राहक संघटना महावितरणच्या याचिकेला तीव्र विरोध दर्शवतील, अशी अपेक्षा आहे. आयोगातर्फे सोमवारी अमरावती येथे झालेली जनसुनावणी अवघ्या काही तासांत आटोपल्याने ग्राहक संघटनांनी नाराजी व्यक्त केली आहे. या याचिकेवर तिसऱ्यांदा जनसुनावणी होत आहे. महावितरणने २०२५ ते २०३० या कालावधीसाठी वार्षिक वीजदर निश्चित करण्यासाठी याचिका दाखल केली होती. आयोगाने जनसुनावणी घेऊन २८ मार्च २०२५ रोजी निर्णय देताना वीजदरांमध्ये सरासरी १० टक्क्यांची कपात केली होती. हा दर १ एप्रिल २०२५ पासून लागू होणार होता.मात्र, महावितरणने पुनर्विचार याचिका दाखल केली. आयोगाने २५ जून २०२५ रोजी नव्याने दर निश्चित केले, जे यापूर्वीच्या दरांपेक्षा अधिक होते.


## महावितरण — ई - निविदा सूचना

महावितरणकडे नोदणीकृत असलेल्या नामांकित व अनुभवी पुरवठादार व कंत्राटदार यांचे कडून पिंपरी विभागा अंतर्गत खालील सामानांचा पुरवठा / कामे करण्यासाठी ई –निविदा मागविण्यात येत आहेत.

| निविदा क्रं. का.अ./ पिंपरी /25-26 | सामानांचा / कामाचा तपशील | निविदा रक्कम रु.लाख |
|---|---|---|
| टी-17 | महावितरण पिंपरी विभाग अंतर्गत सर्व कार्यालयातील संगणक, प्रिंटर तसेच इंटरनेट नेटवर्किंग संबधित कामांची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे | 5 |
| टी-18 | उच्चदाब वाहिनीच्या (HT) भूमिगत केबल आणि लाईन्सच्या देखभाल दुरुस्तीसाठी कंत्राटदार नेमणूक करणे | ---- |
| टी-19 | लघुदाब वाहिनीच्या (LT) भूमिगत केबल आणि लाईन्सच्या देखभाल दुरुस्तीसाठी कंत्राटदार नेमणूक करणे | ---- |
| टी-20 | रोहित्रच्या (DTC) देखभाल दुरुस्तीसाठी कंत्राटदार नेमणूक करणे | ---- |
| टी-21 | निवासी, व्यावसायिक व औद्योगिक नवीन वीज जोडणी आणि वीज भार वाढवण्यासाठी पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी (NSC INFRA) कंत्राटदार नेमणूक करणे | ---- |
| टी-22 | फ्युज वायर पुरवठा करणे (Fuse wire- 10,12,24 SWG) | 2 |

अधिक तपशीलासाठी कृपया https://etender.mahadiscom.in/eatApp/ या संकेतस्थळाला भेट दयावी.

पी.आर.ओ / 225 /26 — कार्यकारी अभियंता, पिंपरी विभाग

## महावितरण — ई - निविदा सूचना

कार्यकारी अभियंता, महावितरण (MSEDCL), राजगुरुनगर विभाग, पुणे ग्रामीण मंडळ अंतर्गत HT/LT ओव्हरहेड लाईन्स व अंडरग्राउंड केबल्सचे ब्रेकडाऊन मेंटेनन्स, वितरण रोहित्र केंद्र (DTC) देखभाल तसेच नवीन वीजजोडणीसाठी (RCI व इतर) पायाभूत सुविधा विकासाकरिता, महावितरणकडे ई-नोंदणीकृत ठेकेदारांकडून ऑनलाईन पद्धतीने निविदा मागवित आहेत. तपशील पुढीलप्रमाणे:

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे स्वरूप | निविदा शुल्क व अनामत (EMD) |
|---|---|---|---|
| 1 | EE/RGR/T-12/ NSC/2025-26 | राजगुरुनगर विभाग, पुणे ग्रामीण मंडळ अंतर्गत नवीन वीजजोडणीसाठी (RCI व इतर) पायाभूत सुविधा विकासासाठी एजन्सींची नेमणूक | निविदा शुल्क - रु. 10,000 + 18% GST(EMD) - रु. 25,000/- |
| 2 | EE/RGR/T-13/ BMLT/2025-26 | राजगुरुनगर विभाग, पुणे ग्रामीण मंडळ अंतर्गत LT ओव्हरहेड लाईन्स, LT अंडरग्राउंड केबल्स व फ्यूज कॉल्सच्या ब्रेकडाऊन देखभालीसाठी एजन्सींची नेमणूक | निविदा शुल्क – रु. 1,000 + 18% GST EMD – रु. 10,000/- |
| 3 | EE/RGR/T-14/ BMHT/2025-26 | राजगुरुनगर विभाग, पुणे ग्रामीण मंडळ अंतर्गत HT ओव्हरहेड लाईन्स व अंडरग्राउंड केबलच्या ब्रेकडाऊन देखभालीसाठी एजन्सींची नेमणूक | निविदा शुल्क – रु. 1,000 + 18% GST EMD – रु. 10,000/- |
| 4 | EE/RGR/T-15/ BMDTC/2025-26 | राजगुरुनगर विभाग, पुणे ग्रामीण मंडळ अंतर्गत वितरण रोहित्र केंद्र (DTC) ब्रेकडाऊन देखभालीसाठी एजन्सींची नेमणूक | निविदा शुल्क – रु. 1,000 + 18% GST EMD – रु. 10,000/- |

- **निविदा डाउनलोड (विक्री) कालावधी** : दि. 10.02.2026 ते दि. 23.02.2026.
- **निविदा ऑनलाईन सादर करण्याची अंतिम तारीख** : दि. 24.02.2026 रोजी सकाळी 11.00 वाजेपर्यंत.

निविदेसंबंधी सविस्तर माहिती महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे : https://etender.mahadiscom.in/eatApp/

PZ/PRO क्र. 223/2025-26 — कार्यकारी अभियंता, महावितरण, राजगुरुनगर विभाग


### “कोणाला-कोणाची गरज आहे, ते भाजपा अन् संघाने आपापसात ठरवावे”; काँग्रेसचा खोचक टोला

नागपूर (दै. संध्या) : भाजपा सत्तेत आल्यानंतर संघाचे 'अच्छे दिन' आले, असे नाही, तर नेमके याच्या उलट आहे. आम्ही एक विचार आणि तत्व घेऊन पुढे जातो. ज्यांनी त्या विचारांचा पुरस्कार, स्वीकार केला त्यांना निवडणुकीत त्याचा आपोआप लाभ झाला. आम्ही राम मंदिरच्या बाजूने उभे राहिलो. ज्यांनी आमचे विचार स्वीकारले त्यांना राजकीय लाभ झाला, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी केले. संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त वरळीच्या नेहरू सेंटर येथे 'संघ परिवाराची १०० वर्षे नवे क्षितिज' या विषयावर भागवत यांचे व्याख्यान आणि प्रश्नोत्तरे, असा २ दिवसीय कार्यक्रम झाला.


## पुणे महानगरपालिका, पुणे

निविदा प्रक्रिया कक्ष - पाणीपुरवठा विभाग
निविदा जाहिरात - नविन कामे

विक्री कालावधी दिनांक : दि. १०/०२/२०२६ ०९:०० सकाळी ते १७/०२/२०२६ ०२:३० दुपारी पर्यंत — **जाहिरात क्रमांक : १/१६५५ दि. ०९/०२/२०२५**
स्विकृती दिनांक : दि. १०/०२/२०२६ ०९:०० सकाळी ते १७/०२/२०२६ ०२:३० दुपारी पर्यंत — तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : १८/०२/२०२६ ०३:०० दुपारी

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रू. | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत (महिने) | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC/WATER_SUPPLY/2025/641 | पाणीपुरवठा | प्रभाग क्र. ३८ चैत्रबन वसाहत झोपडपट्टी पाण्याची लाईन दुरूस्ती करणे व नव्याने टाकणे. | रू. ७६९/- | रू. १२७१०६५/- | रू. १२७११/- | ६ | दीपक रामचंद्र रोमन ९७८०५९७४६८ |
| PMC/WATER_SUPPLY/2025/642 | पाणीपुरवठा | प्रभाग क्र. ४१ कोंढवा बु. शिव शंभो गल्ली क्र. ४ व ७ पाण्याची लाईन दुरूस्ती करणे व नव्याने टाकणे. | रू. १३५९/- | रू. १६९४८७९/- | रू. १६९४९/- | ६ | दीपक रामचंद्र रोमन ९७८०५९७४६८ |
| PMC/WATER_SUPPLY/2025/643 | पाणीपुरवठा | प्रभाग क्र. ४१ कोंढवा बु. शिक्षक कॉलोनी पाण्याची लाईन दुरूस्ती करणे व नव्याने टाकणे. | रू. १३५९/- | रू. २११८४६५/- | रू. २११८५/- | ६ | दीपक रामचंद्र रोमन ९७८०५९७४६८ |

अ) सदर कामाबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
ब) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाइन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्व जबाबदारी टेंडरदाराची राहील.
क) ऑनलाइन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती पाणीपुरवठा विभाग पुणे म.न.पा. येथे मिळेल.
ड) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)/३२, दि.२२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS/RTGS/NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

सही/- टेंडर लिपिक (पाणीपुरवठा) पुणे महानगरपालिका
सही/- Satish Jadhav (Prabhari) कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) पुणे महानगरपालिका

## थोडक्यात पण महत्वाचे...



### नानचाकू स्पर्धेत महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक

पिंपरी (दैनिक संध्या) : उत्तर प्रदेशातील कानपूर येथे पार पडलेल्या राष्ट्रीय नानचाकू स्पर्धा व पंच सेमिनार स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी तिसरा क्रमांक मिळवला. स्पर्धेत देशभरातून सुमारे ३०० खेळाडूंनी सहभाग घेतला होता. महाराष्ट्रातील खेळाडूंनी फ्री-स्टाइल, काथा आणि कुमिते या खेळ प्रकारांत चमकदार कामगिरी केली. एकांतिका रेड्डी, स्वरा हवळने, स्वरूप एकावडे, अयान शेख, स्वरूपा नामदे, आरुष मोरे, खुशी गुप्ता, अनन्या माने, तृप्ती वाडकर, जिक्रा खान, ओवी मालुसरे, आराध्या मालुसरे, सोहम मालुसरे, युवराज मालुसरे, शिवराज मालुसरे आणि आर्यन जोरवर यांनी पदके जिंकली. दीपक शिर्के, स्वरूप एकवाडे, अनिल शिंदे, विजय कांबळे, रिदम तिवारी, स्वरा जाधव आणि अक्सा मुल्ला यांनी पंच परीक्षा पूर्ण केली. महाराष्ट्र नानचाकू संघाचे महासचिव दीपक शिर्के यांचे मार्गदर्शन मिळाले. नानचाकू असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ. रोहित सक्सेना, अध्यक्ष संजय कपूर आणि महासचिव बाबूल वर्मा यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत देशभरातून सुमारे ३०० खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. महाराष्ट्राच्या संघाने शिस्तबद्ध खेळ, तांत्रिक कौशल्य आणि संयमाच्या जोरावर पदकतालिकेत मानाचे स्थान मिळवले. या यशामुळे राज्यातील नानचाकू खेळाडूंमध्ये नवचैतन्य आणि प्रेरणा निर्माण झाली आहे. या यशाबद्दल खेळाडूंसह प्रशिक्षक आणि संघ व्यवस्थापनाचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. भविष्यातील स्पर्धांसाठी संघाकडून भरीव कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




### महापालिकेचे टेंडर मिळवून देण्याच्या बहाण्याने 11 लाख 61 हजारांची फसवणूक

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महापालिकेचे झाडे लावण्याचे टेंडर मिळवून देतो असे सांगून एका तरुणाची ११ लाख ६१ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक करण्यात आली. ही घटना २० एप्रिल २०२४ ते १४ सप्टेंबर २०२४ दरम्यान भोसरीतील लांडगे आळी येथे घडली. संदेश नंदकुमार लांडगे (३२, रा. साई निवास, लांडगे आळी, भोसरी) यांनी या प्रकरणी भोसरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार, अभिजित संतोष गायकवाड (रा. दिघी रोड, भोसरी) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने फिर्यादीचा विश्वास संपादन करून टेंडर मिळवण्यासाठी वेळोवेळी १७ लाख ४९ हजार रुपये घेतले. त्यापैकी फक्त ५ लाख ८८ हजार रुपये परत केले. टेंडर मिळाल्याचे खोटे सांगून आरोपीने बनावट पत्राची प्रत फिर्यादीला दिली आणि त्यांची फसवणूक केली. भोसरी पोलिस तपास करत आहेत.

### दहावी-बारावी परीक्षांसाठी कडक कॉपीमुक्त अभियान; पोलिसांचा विशेष बंदोबस्त

पिंपरी (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे (राज्य मंडळ) यांच्या निर्देशानुसार दहावी व बारावीच्या परीक्षेदरम्यान कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. या अनुषंगाने पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वतीने परीक्षाकेंद्रांवर कडक उपाययोजना करण्यात येणार आहेत. राज्यभरात बारावीची परीक्षा २० फेब्रुवारी २०२६ पासून तर दहावीची परीक्षा १० फेब्रुवारी २०२६ पासून सुरू होत असून, परीक्षेदरम्यान कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होऊ नये यासाठी पोलिस प्रशासन सतर्क आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील दहावीचे ७१ तर बारावीचे ४२ परीक्षा केंद्रांवर विशेष बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. परीक्षा केंद्रांच्या परिसरात १०० मीटरच्या आत अनधिकृत व्यक्तींचा वावर, खाजगी शिकवणी वर्ग, सायबर कॅफे, झेरॉक्स सेंटर, फॅक्स सेंटर, पी.सी.ओ. तसेच ध्वनिक्षेपकांचा वापर करण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच मोबाईल, ब्लूटूथ उपकरणे, इंटरनेट साधने किंवा तत्सम इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर करण्यावर कडक बंदी घालण्यात आली आहे. परीक्षेदरम्यान भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ अंतर्गत कलम १६३ अन्वये आदेश लागू राहणार असून, आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असून आवश्यकतेनुसार व्हिडिओ चित्रीकरणही केले जाणार आहे. विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्यासाठी मदत करणे, कॉपी पुरवणे किंवा परीक्षेदरम्यान कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार करताना आढळल्यास संबंधितांवर Prevention of Malpractices Act 1982 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# पिंपरी चिंचवडमध्ये ऊर्जा स्वयंपूर्णतेच्या दिशेने ठोस पाऊल

**आमदार शंकर जगताप : पुनावळेतील "७ प्लुमेरिया ड्राइव्ह" सोसायटीत ५७५ किलोवॅट सौर प्रकल्पाचे लोकार्पण**




पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी चिंचवडमध्ये शाश्वत विकास आणि पर्यावरणपूरक धोरणांना प्राधान्य देत आमदार शंकर जगताप यांच्या नेतृत्वाखाली हरित ऊर्जेकडे वाटचाल अधिक गतिमान होत. याच पार्श्वभूमीवर

पुनावळे येथील ७ प्लुमेरिया ड्राइव्ह गृहनिर्माण सोसायटीत उभारण्यात आलेल्या ५७५ किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पाचे लोकार्पण रविवारी (दि ८) रोजी करण्यात आले. ऊर्जा स्वयंपूर्णतेच्या दिशेने हे ठोस पाऊल टाकण्यात आले आहे असेही आमदार जगताप यावेळी म्हणाले.

चिंचवड मतदार संघातील ७ प्लुमेरिया ड्राईव्ह या गृहनिर्माण सोसायटीत उभारण्यात आलेल्या ५७५ किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पाचे लोकार्पण आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. सोसायटीमध्ये पार पडलेल्या कार्यक्रमाला सोसायटीचे अध्यक्ष डॉ गणेश भामे, सचिव शिवराज हराळे, खजिनदार धनंजय पाठक आणि सर्व फेडरेशन कमिटी तसेच रहिवासी उपस्थित होते.

आमदार शंकर जगताप पुढे म्हणाले, गृहनिर्माण सोसायटी स्तरावर उभारण्यात आलेला हा सौर ऊर्जा प्रकल्प शहरातील ऊर्जा स्वयंपूर्णतेच्या दृष्टीने महत्त्वाचा मापदंड मानला पाहिजे. याचा आदर्श शहरातील इतर सोसायटी देखील घेतील असा विश्वास आहे. या प्रकल्पामुळे सोसायटीचा वीज खर्च लक्षणीयरीत्या कमी होणार आहे. सुमारे ९ ते १० लाख रुपयांचे सोसायटीचे वीज बिल आत्ता ५० हजार ते १ लाख पर्यंत येत आहे. यातून भविष्यातील वीज दरवाढीपासून रहिवाशांना दिलासा मिळणार आहे यामुळे पारंपरिक ऊर्जास्रोतांवरील अवलंबित्व कमी होऊन पर्यावरणपूरक विकासाला चालना मिळणार आहे. १० एकर परिसरात वसलेल्या आणि ९५० सदनिका व ३ हजार रहिवासी असलेल्या या सोसायटीसाठी हा प्रकल्प दीर्घकालीन ऊर्जा नियोजनाचा भाग असून रहिवाशांच्या लोकसहभागातून साकारलेला हा उपक्रम सामाजिक जबाबदारीचे आदर्श उदाहरण ठरत आहे. अडीच कोटी रुपयांची गुंतवणूक करून उभारण्यात आलेला हा प्रकल्प शाश्वत विकास आणि आर्थिक बचत या दोन्ही बाबींना पूरक ठरणार आहे.या सौर ऊर्जा प्रकल्पाच्या माध्यमातून दरवर्षी मोठ्या प्रमाणात वीज निर्मिती होणार असून कार्बन डायऑक्साइड उत्सर्जनात लक्षणीय घट होऊन पर्यावरण संरक्षणाला हातभार लागणार आहे.हरित व स्वच्छ ऊर्जेचा वापर वाढल्याने शहराच्या पर्यावरणीय संतुलनाला बळ मिळणार आहे.

आमदार शंकर जगताप पुढे म्हणाले, केंद्र व राज्य शासनाच्या हरित ऊर्जा आणि स्वच्छ ऊर्जा धोरणाशी सुसंगत असलेल्या या उपक्रमाचे कौतुक आहे. गृहनिर्माण सोसायट्यांनी पुढाकार घेतल्यास शहरे ऊर्जा स्वयंपूर्ण बनू शकतात असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दरम्यान या

एकूण खर्च अडीच कोटी रुपये इतका झाला आहे. ४० लाख रुपयांची सबसिडी मिळाली. तसेच आमदार निधी मधून १० लाख रुपये मंजूर केले आहेत.

> देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली ऊर्जा स्वयंपूर्णतेच्या दृष्टीने सक्षम पावले टाकली जात आहे. सौर ऊर्जा त्यातील एक महत्त्वाचा उपक्रम आहे. हा सौर ऊर्जा प्रकल्प पिंपरी चिंचवड शहरासह पुणे जिल्हा आणि राज्यातील इतर गृहनिर्माण सोसायट्यांसाठी हरित ऊर्जेकडे जाण्याचा मार्ग दाखवणारा आदर्श ठरेल. तसेच पर्यावरणपूरक आणि शाश्वत जीवनशैलीकडे नेणारा प्रभावी टप्पा असणार आहे. पिंपरी चिंचवड शहराला स्मार्ट आणि मेट्रोपॉलिटीन शहराचा मानबिंदू समजले जाते. त्या माध्यमातून पर्यावरण पूरक ऊर्जेच्या दृष्टिकोनातून होणारे असे प्रकल्प नक्कीच इतर अनेक सोसायट्यांना आदर्शवत ठरणार आहेत.
>
> **– शंकर जगताप आमदार, पिंपरी चिंचवड शहर.**

## महात्मा गांधी शाळा बनली मद्यपी व गुन्हेगारांचा अड्डा

पिंपरी (दै. संध्या) :

देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या अखत्यारित असलेली देहूरोड बाजारपेठेतील महात्मा गांधी मराठी शाळा सध्या पूर्णतः दुर्लक्षित अवस्थेत आहे. शाळेच्या धोकादायक इमारत मद्यपी व गर्दुल्यांचा अड्डा बनली आहे. ही इमारत धोकादायक म्हणून घोषित करण्यात आली असली, तरी कोणतीही सुरक्षा व्यवस्था नसल्यामुळे मद्यपींचा वावर वाढला आहे. दिवसा तसेच रात्री उघडपणे गर्दुल्यांचे टोळके शाळेच्या आवारात नशा करत ठाण मांडून बसते. त्यानंतर हे टोळके बाजारपेठेत धुमाकूळ घालत व्यापारी, महिला, तरुणी व नागरिकांना त्रास देत असल्याच्या तक्रारी सातत्याने वाढत आहेत. विशेषतः महिलांमध्ये व तरुणींमध्ये सुरक्षिततेबाबत तीव चिंता निर्माण झाली असून, परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. गेल्या दोन महिन्यांत बाजारपेठेत चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. काही रात्री चार ते पाच दुकाने फोडल्याच्या घटना घडल्या असून, व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे व्यापारी वर्गात असुरक्षिततेची भावना वाढत असून, रात्री दुकाने बंद करताना भीती वाटत असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. महात्मा गांधी मराठी शाळेची इमारत सध्या पूर्णतः जीर्ण व धोकादायक बनली आहे.

## शुभेच्छांसाठी हार-पुष्पगुच्छ नको.. विद्यार्थ्यांसाठी वही-पेन द्या

**महापौर रवी लांडगे यांचे नागरिकांना आवाहन**

पिंपरी (दै. संध्या) :

महापौर पदाच्या शुभेच्छा देताना कुणीही हार, पुष्पगुच्छ अथवा अन्य भेटवस्तू घेऊन येऊ नयेत. त्याऐवजी द्यावयाच्याच असल्यास महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य म्हणून उपयोगी ठरेल अशी पुस्तके, वह्या, लेखन साहित्य किंवा अन्य शैक्षणिक वस्तू शुभेच्छा अथवा भेटीच्या वेळी आणाव्यात, असे आवाहन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवी लांडगे यांनी केले आहे.

महापौर रवी लांडगे हे नुकतेच दोन दिवसीय वरिष्ठ नेत्यांच्या भेटी व दौऱ्यावर होते. या कालावधीत शहरातील नागरिकांच्या प्रत्यक्ष भेटी घेता न आल्याबद्दल त्यांनी नागरिकांची दिलगिरी देखील व्यक्त केली.

हार-पुष्पगुच्छ क्षणिक सन्मानाचे प्रतीक असले, तरी विद्यार्थ्यांसाठी दिलेले शैक्षणिक साहित्य त्यांच्या शिक्षणासाठी व भविष्यासाठी अधिक उपयुक्त ठरते, असे महापौर रवि लांडगे यांनी बोलताना सांगितले. या उपक्रमातून महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना थेट शैक्षणिक मदत मिळणार असून, शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत साधनांची पूर्तता होण्यास हातभार लागणार आहे. औपचारिक शुभेच्छांऐवजी



विद्यार्थ्यांच्या शिक्षणात गुंतवणूक करण्याचा हा सकारात्मक व सामाजिकदृष्ट्या उपयुक्त संदेश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक बळ वाढावे, त्यांना आवश्यक साहित्य वेळेवर उपलब्ध व्हावे आणि समाजामध्ये शिक्षणाबाबत सकारात्मक जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने हे आवाहन करण्यात आले आहे. नागरिकांनी सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून या उपक्रमाला प्रतिसाद द्यावा, असेही महापौर लांडगे यांनी आवाहन केले आहे.

## स्त्रीशक्तीचा अभिमान : तनु भानमुळे पिंपळे सौदागरच नव्हे तर संपूर्ण पिंपरी- चिंचवड आणि महाराष्ट्राचे नाव उज्वल – शत्रुघ्न काटे

पिंपरी (दै. संध्या) :



प्रजासत्ताक दिनाच्या परेडनंतर राजधानी दिल्लीत Cariappa Parade Ground येथे पार पडलेल्या एनसीसी रॅलीमध्ये महाराष्ट्राच्या कन्येने देशपातळीवर आपला ठसा उमटवला. महाराष्ट्र संचालनालयाची ज्युनिअर अंडर ऑफिसर तनु भान हिने आर्मी विंग (सीनियर विंग) मधून देशातील सर्वोच्च 'बेस्ट कॅडेट' हा मानाचा किताब पटकावला.

एका दिमाखदार सोहळ्यात भारताचे पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते तनु भान हिला सुवर्ण पदक आणि मानाची 'केन' देऊन गौरविण्यात आले. शिस्त,नेतृत्व, शारीरिक क्षमता, आत्मविश्वास आणि राष्ट्रसेवेची भावना या सर्व निकषांवर उत्कृष्ट कामगिरी करत तिने हा सन्मान मिळवला. विशेष म्हणजे तनु भान ही पिंपळे सौदागर येथील रहिवासी असून, तिच्या या यशामुळे केवळ तिच्या प्रभागाचेच नव्हे, तर संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहराचे आणि महाराष्ट्राचे नाव देशपातळीवर अधोरेखित झाले आहे.

या अभिमानास्पद यशाबद्दल पिंपरी-चिंचवड भाजप शहराध्यक्ष तथा नगरसेवक श्री शत्रुघ्न (बापू) काटे यांनी तनु भान तसेच त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन तिचा विशेष सन्मान केला. तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत त्यांनी तिच्या कर्तृत्वाचे मनापासून कौतुक केले. महिलाशक्ती, जिद्द आणि नेतृत्वाचे प्रतीक ठरलेली तनु भान आज लाखो मुलींसाठी प्रेरणास्थान बनली आहे. राष्ट्रसेवेच्या क्षेत्रात मुली कोणत्याही बाबतीत कमी नाहीत, हे तिने आपल्या कर्तृत्वातून पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

याप्रसंगी शत्रुघ्न (बापू) काटे म्हणाले की, "तनु भान ही पिंपळे सौदागरची कन्या असल्याने तिने केवळ आपल्या पिंपळे सौदागरचाच नव्हे, तर संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहराचा आणि महाराष्ट्राची मान देशपातळीवर उंचावली आहे. तनु भान हिचे यश हे केवळ तिचे वैयक्तिक यश नसून, हे महाराष्ट्राच्या मुलींच्या क्षमतेचे आणि देशातील महिलाशक्तीचे तेजस्वी उदाहरण आहे. शिस्त, परिश्रम आणि देशभक्तीच्या बळावर मुली कोणतेही शिखर सर करू शकतात, याचा अभिमानास्पद संदेश तनुने देशाला दिला आहे. तिची ही वाटचाल हजारो तरुणींसाठी प्रेरणादायी ठरेल तसेच मुली कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत, हे तनुने आपल्या कर्तृत्वातून संपूर्ण देशाला दाखवून दिले आहे. तिची ही यशोगाथा पिंपळे सौदागर व पिंपरी-चिंचवड शहरासाठी अभिमानाची बाब आहे," असे गौरवोद्गार त्यांनी काढले."

याप्रसंगी विनोद पाटील, तनु भान यांचे कुटुंबातील सदस्य तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

## पुणे मेट्रो पिंक लाईनचे स्टेअरिंग महिलांच्या हाती

पिंपरी (दै. संध्या) :

पुणे शहरातील तिसरा मेट्रो मार्ग म्हणजेच माण, हिंजवडी ते शिवाजीनगर (पिंक लाईन) ही मेट्रो सेवा प्रत्यक्षात मार्गावर धावण्यासाठी संबंधित कंपनीचे प्रयत्न सुरु आहेत. या मेट्रोचे स्टेअरिंग महिलांच्या हातात देण्यात येणार आहे. अभियंता असलेल्या तरुणींना मेट्रोचे सारथ्य करण्यासाठी त्यांचे प्रशिक्षण देखील पूर्ण झाले आहे. पहिल्या टप्प्यात शंभर महिला ट्रेन पायलटची नेमणूक केली असून, पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेडने या प्रकल्पाच्या संचलन आणि देखभाल करणार आहे. सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून आकाराला येत असलेल्या या प्रकल्पात टाटा आणि सीमेन्स यांसारख्या कंपन्यांचा सहभाग आहे. मात्र, केवळ महिलांच्या हाती संचलनाची धुरा सोपवण्याचा हा निर्णय जागतिक

**■ जागतिक पातळीवर 'अद्वितीय' उपक्रम**

रेल्वे क्षेत्रात 'अद्वितीय उपक्रम' म्हणून ओळखला जाणार आहे. या ट्रेन पायलट महिलांच्या निवडीसोबतच त्यांच्या सुरक्षिततेसाठी विशेष 'प्रोटोकॉल' तयार करण्यात आले आहेत. कामाच्या ठिकाणापासून ते प्रवासापर्यंतच्या सुरक्षिततेची जबाबदारी ही कंपनी घेणार आहे. हा प्रकल्प केवळ वाहतुकीचे साधन नसून तो महिला सक्षमीकरणाचे जागतिक प्रतीक ठरेल, असा विश्वास 'पीएमआरडीए'ने व्यक्त केला. दरम्यान, हा मार्ग मार्च 2026 मध्ये सुरु करण्यासाठी संबंधित कंपनीकडून प्रयत्न सुरु आहेत. तांत्रिक आणि सिग्नलचे काम झाले आहे. त्यानुसार या कामाचे प्रशिक्षण संबंधित महिलांना देण्यात येत आहे. तसेच, या कामाची माहिती व कामाचे स्वरुप समजून सांगण्यात येत आहे.

# पिंपरी-चिंचवडची तहान वाढतेय; सत्ताधाऱ्यांसमोर पाणीटंचाईचे आव्हान

**लोकसंख्या दुपटीहून अधिक वाढणार; पाणी नियोजन न झाल्यास शहरासमोर गंभीर संकट**

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी-चिंचवड शहरवाढीचा वेग लक्षात घेता तसेच आजूबाजूच्या गावांच्या समावेशामुळे येत्या दहा वर्षांतच लोकसंख्या दुपटीहून अधिक होणार आहे. फुगत असलेल्या पिंपरी-चिंचवडची तहान भागवण्यासाठी महापालिकेने तातडीने दीर्घकालीन उपाययोजना करणे आवश्यक आहे. उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच अनेक भागांना पाणीटंचाईची झळ बसू लागली आहे. शहराला वर्षभर योग्य दाबाने पुरेसे पाणी देण्यासाठी सत्ताधारी भाजपला खूपच धडपड करावी लागणार आहे. अन्यथा 'येरे माझ्या मागल्या..' अशी अवस्था होऊ शकते.

उन्हाळा सुरू झाल्याने सध्या शहरातील अनेक भागांत पुरेसे पाणी मिळत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. थेरगाव, रहाटणी, दापोडी, सांगवी, चिखली, रावेत आदी भागांत कमी दाबाने पाणी येत असल्याच्या तक्रारींची संख्या मोठी आहे.

काही हाउसिंग सोसायट्यांना पाण्याच्या खासगी टँकरवर अंवलबून राहावे लागत आहे. लोकसंख्येचा वेग, पाण्याची वाढती मागणी आणि महापालिकेत हिंजवडी, माण, मारुंजी, जांबे, नेरे, सांगवडे, गहुंजे या सात



गावांचा आणि देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्ड हद्दीतील नागरीवस्तीचा समावेश होण्याची शक्यता आहे. त्या भागांमुळे शहरात सुमारे 3 लाखांपेक्षा अधिक लोकसंख्येची भर पडणार आहे.

शहराला पुरेसे पाणी मिळावे, यासाठी पाण्याचे योग्य नियोजन करण्याची गरज निर्माण झाली आहे. शहराची तहान भागविण्यासाठी प्रशासनासह सत्ताधाऱ्यांना पाण्याचे अतिरिक्त स्रोत शोधण्यासोबत पाण्याच्या बचतीसह पाणीगळती, चोरी व नासाडीला लगाम लावण्याची गरज आहे. त्यादृष्टीने कठोर उपाययोजना करण्याची गरज आहे. त्यासाठी सत्ताधाऱ्यांनी नियोजनबद्ध कृती आराखडा तयार करून प्रशासनाकडून त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करून घेणे आवश्यक आहे.

मुदतवाढ संपूनही भामा आसखेड धरणातून 167 एमएलडी पाणी आणण्यासाठी जॅकेवल आणि भूमिगत जलवाहिनीचे काम केवळ 65 टक्के झाले आहे. उर्वरित काम पूर्ण होण्यास वर्षभर लागणार आहे. थेट आंद्रा धरणातून 100 एमएलडी पाणी उचलण्याचे कामाची अद्याप निविदा काढलेली नाही. गेल्या 14 वर्षापासून ठप्प असलेल्या 400 कोटी पवना बंद जलवाहिनी प्रकल्पाचा खर्च 1 हजार 15 कोटींवर पोहचला आहे. त्याचा नवीन डीपीआर तयार करण्यात आला असून, त्यासाठी कर्ज काढण्याचे नियोजन आहे. त्या प्रकल्पामुळे शहराला 100 एमएलडी अतिरिक्त पाणी मिळणार आहे. हिंजवडीसह सात गावे महापालिकेत समाविष्ट करताना त्या भागांकरीता पाणी आरक्षण वाढून द्यावे, अशी मागणी महापालिकेकडून राज्य सरकारकडे केली आहे. मुळशी धरणातून 760 एमएलडी पाणी देण्यास राज्य शासनाने प्रतिसाद दिलेला नाही. मावळ तालुक्यातील ठोकरवाडी धरणातून पाणी शहराला मिळावे म्हणून नवा प्रस्ताव देण्यात आला आहे.

**शहराचा पाणी प्रश्न टॉपवर**

> पिंपरी-चिंचवड शहराचा पाणी प्रश्न आमच्यासाठी सर्वात प्रथम आहे. संपूर्ण शहराला योग्य दाबाने व पुरेशा प्रमाणात पाणी मिळावे यासाठी आमचे प्रयत्न आहेत. त्या दृष्टीने पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन चर्चा केली आहे. त्यांना योग्य ते निर्देश दिले आहेत. पाणी शुद्धीकरण, पुरवठा, व्यवस्थापन यातील त्रुटी दूर करण्यास प्राधान्य दिले जाणार आहे, असे महापौर रवी लांडगे यांनी सांगितले.

**येत्या दहा वर्षांत 53 लाख लोकसंख्येचा अंदाज**

> पिंपरी-चिंचवड हे देशात राहण्यायोग्य शहर म्हणून ओळखले जाते. शहर चारीबाजूने वाढत आहे. सन 2011 च्या जनजगणेनुसार शहराची लोकसंख्या 17 लाख 28 हजार इतकी होती. अंदाजे लोकसंख्या 30 लाख इतकी आहे. सन 2031 मध्ये लोकसंख्या अंदाजे 52 लाख 74 हजार 781 इतकी होणार आहे. सन 2041 ला लोकसंख्या तब्बल 96 लाखांपर्यंत पोचण्याचा अंदाज आहे. त्यामुळे शहराला सध्यापेक्षा दुप्पटी अधिक पाण्याची गरज भासणार आहे.


## थोडक्यात पण महत्वाचे...



### पत्रकार प्रल्हाद गिरमे राज्यस्तरीय जनसेवा पुरस्काराने सन्मानित

जेजुरी (दैनिक संध्या) : श्री. क्षेत्र जेजुरी येथील कै. दिनकरराव सावंत स्मृती प्रतिष्ठान व शिवाजीराव यादव राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार समितीच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते, आदर्श शिक्षक व पत्रकार प्रल्हाद गिरमे यांना कै. दिनकरराव सावंत स्मृती प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय जनसेवा पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य तसेच राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार समितीचे अध्यक्ष प्राचार्य नंदकुमार सागर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी बोलताना प्राचार्य नंदकुमार सागर म्हणाले की, पत्रकार प्रल्हाद गिरमे यांनी पत्रकारिता, शैक्षणिक तसेच सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय व भरीव कार्य केले आहे. पुरंदर तालुक्यात विविध शिक्षक संघटनांचे प्रसिद्धी प्रमुख म्हणून त्यांनी केलेले कार्य अत्यंत कौतुकास्पद असून, त्यांच्या या योगदानाची दखल घेऊन त्यांना राज्यस्तरीय जनसेवा पुरस्कार देण्यात आला आहे. कार्यक्रमावेळी कै. दिनकरराव सावंत स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय सावंत यांनीही मनोगत व्यक्त करताना सांगितले की, प्रल्हाद गिरमे यांनी शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कार्य केले असून समाजासाठी त्यांचे योगदान प्रेरणादायी आहे.

### असाध्य आजाराशी 30 वर्षांपासून झुंज; महेंद्र सुभाष भंडारींचा जिद्दीचा प्रवास



जेजुरी (दैनिक संध्या) : महेंद्र सुभाष भंडारी (वय ५५) हे गेली तीन दशके 'मस्क्युलर अॅट्रोफी' या दुर्मिळ व असाध्य आजाराशी धैर्याने लढा देत आहेत. या आजारामुळे त्यांच्या गळ्यापासून खालील सर्व अवयव निकामी झाले असून त्यांना कोणतीही हालचाल करता येत नाही. दैनंदिन जीवनातील सर्व कामांसाठी त्यांना पूर्णपणे इतरांवर अवलंबून राहावे लागते. गेल्या ३० वर्षांपासून या आजाराचा सामना करत असताना भंडारी यांची स्मरणशक्ती व संवेदना पूर्णपणे व्यवस्थित आहेत. मात्र शरीराची हालचाल पूर्णपणे थांबल्याने त्यांचे जीवन केअरटेकरच्या मदतीवर चालते. आई-वडिलांच्या निधनानंतर ते विविध वृद्धाश्रमांमध्ये राहात असून त्यांचा सर्व खर्च भाऊ आणि नातेवाईक उचलत आहेत. अत्यंत कठीण परिस्थितीतही भंडारी यांनी हार मानलेली नाही. उलट, स्वतःच्या अनुभवातून ते इतर रुग्णांना धैर्य देण्याचे काम करत आहेत. "या आजाराने अनेक लोक ग्रस्त आहेत. कुणीही खचून जाऊ नका. धैर्याने आजाराशी लढा द्या आणि आनंदी राहण्याचा प्रयत्न करा," असा संदेश त्यांनी दिला. असाध्य आजाराने ग्रस्त असतानाही जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोन ठेवत जगण्याचा भंडारी यांचा संघर्ष अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या जिद्दीमुळे आजाराशी लढण्याची ताकद आणि आशा जिवंत ठेवण्याचा संदेश समाजापर्यंत पोहोचत आहे.

### म. कृष्णराजबाबा शास्त्री पंजाबी यांची अखिल भारतीय महानुभाव परिषद सचिवपदी निवड



कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : ५० वर्षापासून अखिल भारतीय महानुभाव परिषद कार्यकारिणीचे सदस्य व २० वर्षा पासून परिषदेचे सचिव म्हणून महानुभाव पंथाची सेवा करणारे - पंजाबी कुलाचार्य म.कृष्णराजबाबा शास्त्री पंजाबी महानुभाव यांची अखिल भारतीय महानुभाव परिषदेच्या सचिव म्हणून फेरनिवड करण्यात आली. सदरची निवड हि अखिल भारतीय महानुभाव परिषद अध्यक्ष कविश्वर कुळाचार्य प.पु.प.म.श्री कारंजेकर बाबा महानुभाव यांनी केली. पुणे जिल्ह्यातील शिष्य परिवार वतीने शुभेच्छांच्या वर्षाव बाबाजी वर होत आहे. अखिल भारतीय महानुभाव परिषदने ज्या विश्वासाने श्रद्धेने जबाबदारी दिली ती निश्चितच मी त्यास न्याय देणार असं मतं नवनिर्वाचित परिषद सचिव पंजाबी कुलाचार्य म.कृष्णराजबाबा शास्त्री पंजाबी महानुभाव यांनी मांडले.



### दीक्षित यांना सावित्रीच्या लेकी सन्मान

दौंड (दैनिक संध्या) : सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यासाठी इंडियन स्टुडंट कौन्सिलच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय 'सावित्रीच्या लेकी' विशेष सन्मान पुरस्कार यंदा अश्विनी दीक्षित यांना पुणे येथे प्रदान करण्यात आला. पुणे येथील फुलेवाडा येथे आयोजित कार्यक्रमात मान्यवर ज्येष्ठ अभिनेत्री वरंग करणे सुषमा देशपांडे कवी व गायक अरुण म्हात्रे यांच्या उपस्थितीत अश्विनी दीक्षित यांना सन्मानपत्र व गौरवचिन्ह देऊन गौरविण्यात आले. शिक्षण, सामाजिक प्रबोधन, साहित्य आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण व प्रेरणादायी कार्याची दखल घेत हा सन्मान देण्यात आला. या कार्यक्रमात महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रातील ज्येष्ठ अभिनेत्री विभावरी देशपांडे तसेच मुंबईच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनाही विशेष सन्मानाने गौरविण्यात आले. तसेच राज्यस्तरीय पुरस्कार चिन्मयी सुमित, अनिल कलकुटकी आणि डॉ. जगन्नाथ गोपाल यांना प्रदान करण्यात आले. इंडियन स्टुडंट कौन्सिल गेल्या अनेक वर्षांपासून सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना 'सावित्रीच्या लेकी' या सन्मानातून गौरवित करत असून, या उपक्रमातून महिलांच्या कर्तृत्वाला ओळख मिळावी आणि समाजात प्रेरणादायी संदेश पोहोचावा, हा उद्देश आहे.

### जयश्री कारकर यांचे निधन



पुरंदर (दैनिक संध्या) : काळदरी (ता.पुरंदर) येथील जयश्री प्रल्हाद कारकर (वय ४७) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांनी बचत गटाच्या माध्यमातून अनेक महिलांना एकत्र केले होते.तसेच त्यांना सामाजिक कार्याची आवड होती. त्यांच्या मागे सासू, पती,दीर एक मुलगा,एक मुलगी असा परिवार आहे. सिरम इन्स्टीट्यूट येथील अधिकारी प्रफुल्ल कारकर यांच्या मातोश्री तर पुरंदर तालुका माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष प्रल्हाद कारकर यांच्या त्या पत्नी होत.

# जुन्नर तालुक्यात राष्ट्रवादी आघाडीवर

## जिल्हा परिषदेत ४ तर पंचायत समितीत शिंदे गटाचे वर्चस्व

**जुन्नर (दै. संध्या)**

जुन्नर : जुन्नर तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे निकाल जाहीर झाले असून तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसने जिल्हा परिषदेत ४ जागा मिळवत आघाडी घेतली आहे. तर शिवसेना शिंदे गटाने ३ जागा आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने १ जागा मिळवत आपले अस्तित्व दाखवून दिले. पंचायत समिती निवडणुकीत मात्र शिवसेना शिंदे गटाने ८ जागा जिंकत वर्चस्व प्रस्थापित केले. राष्ट्रवादीला ६, शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाला १ आणि भाजपला १ जागा मिळाली.

तालुक्यात शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे तालुकाप्रमुख माऊली खंडागळे व उपतालुकाप्रमुख मंगेश अण्णा काकडे यांनी शिंदे गटात प्रवेश केल्यानंतरही पक्षाचे अस्तित्व टिकवून ठेवण्याची कामगिरी गुलाब विठ्ठल पारखे यांनी बजावली. त्यांनी सावरगाव-कुसूर गटात विजय मिळवून पंचायत समिती कुसूर गणात जितेंद्र ढोले यांचा विजय सुकर केला. भाजपच्या ज्येष्ठ नेत्या आशाताई बुचके यांना पराभवाचा सामना करावा लागला. तसेच शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे तालुकाप्रमुख माऊली खंडागळे यांनी शिंदे गटात प्रवेश करून पत्नीला उमेदवारी दिली होती; मात्र त्यांनाही पराभव पत्करावा लागला. राष्ट्रवादीचे तालुका प्रमुख पांडुरंग पवार यांच्या सुनेलाही पराभवाचा सामना करावा लागला.



**जिल्हा परिषद व पंचायत समिती विजयी उमेदवार**

१) डिंगोरे-उदापूर गट
सोनाबाई तुकाराम दाभाडे – ११,८०८ (राष्ट्रवादी)
उदापूर गण – आशा कैलास डावखर – ६,१८६ (राष्ट्रवादी)
डिंगोरे गण – नीलम मनोज आमले – ६,१५८ (राष्ट्रवादी)

२) ओतूर-धालेवाडी तर्फे हवेली गट
छाया अतुल तांबे – ११,३४६ (राष्ट्रवादी)
ओतूर गण – प्रशांत सखाराम डुंबरे – ५,७७४ (राष्ट्रवादी)
धालेवाडी गण – उल्का बबन मोरे – ५,०५८ (राष्ट्रवादी)

३) आळे-पिंपळवंडी गट
मंगेश गुलाबराव काकडे – १४,०१५ (शिवसेना शिंदे)
आळे गण – सपना जीवन शिंदे – ५,७७३ (शिवसेना शिंदे)
पिंपळवंडी गण – जयसिंग रखमा पोटे – ६,३७१ (शिवसेना शिंदे)

४) बेल्हे-राजुरी गट
स्मिता पंकज कनसे – १५,०५८ (शिवसेना शिंदे)
बेल्हे गण – राजेंद्र बबन पिंगट – ६,७७९ (शिवसेना शिंदे)
राजुरी गण – शांताराम दशरथ दाते – ७,४८५ (शिवसेना शिंदे)

५) बोरी बुद्रुक-खोडद गट
कल्पना वैभव काळे – ९,७१३ (राष्ट्रवादी)
बोरी बुद्रुक गण – संभाजी शिवाजीराव चव्हाण – ६,२१५ (राष्ट्रवादी)
खोडद गण – माधुरी सचिन निलख – ६,६७० (शिवसेना)

६) नारायणगाव-वारूळवाडी गट
नेहा योगेश पाटे – १३,७२८ (शिवसेना शिंदे)
नारायणगाव गण – सुषमा अर्जुन वाव्हळ – ६,७७३ (शिवसेना शिंदे)
वारूळवाडी गण – जयश्री दिलीप बनकर – ३,९५५ (शिवसेना शिंदे)

७) सावरगाव-कुसूर गट
गुलाब विठ्ठल पारखे – १०,४७३ (शिवसेना उद्धव ठाकरे)
सावरगाव गण – संजय सुरेश व्हाडी – ४,२४१ (भाजप)
कुसूर गण – जितेंद्र जयानंद ढोले – ५,२६० (शिवसेना उद्धव ठाकरे)

८) बारव-तांबे गट
मोनाली (माई) अमोल लांडे – १२,८४१ (राष्ट्रवादी)
बारव गण – अश्विनी सिताराम केदारी – ४,९३० (राष्ट्रवादी)
तांबे गण – कमलताई बाळासाहेब शेळकंदे – ४,१८३ (शिवसेना शिंदे)

## खडकवासला धरणाजवळील पूल नागरिकांसाठी जीवघेणा

**खडकवासला (दै. संध्या)**

खडकवासला धरणाजवळील पूल धोकादायक अवस्थेत असूनही प्रशासन याकडे दुर्लक्ष करत आहे. पुलावरील जड आणि उंच वाहनांना रोखण्यासाठी बसवलेली उंची प्रतिबंधक चौकट अज्ञात वाहनाच्या धडकेत मोडली गेली असून, पुलावर अजूनही जड वाहने ये-जा करत असल्याचे पाहायला मिळत आहे. याठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे असूनही कोणतीही कारवाई झाली नाही. जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनांकडे दुर्लक्ष करत महापालिका, पोलिस आणि पाटबंधारे विभाग नागरिकांच्या जिवाशी खेळत असल्याचा संताप व्यक्त केला जात आहे. दररोज हजारो नागरिक या पुलावरून प्रवास करतात, तरीही संबंधित यंत्रणा अपघाताची वाट पाहत असल्याचा प्रश्न उपस्थित केला जात आहे. जून महिन्यात जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याच्या सूचना दिल्या होत्या. धरणाजवळील पुलाची जबाबदारी पाटबंधारे विभागाकडे आहे, तरीही महापालिकेने पुढाकार घेऊन पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट करून दुरुस्तीचा प्रस्ताव तयार केला आहे.

## युरोपमध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय शिक्षण परिषदेसाठी डॉ. सागर आटोळे यांची निवड

**बारामती (दै. संध्या)**



बारामती तालुक्यातील ज्ञानसागर गुरुकुलचे संस्थापक व शिक्षणतज्ज्ञ डॉ.सागर आटोळे यांची युरोपमध्ये फिनलंड देशातील हेलसिंकी,याठिकाणी होणाऱ्या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय सृजनशील शिक्षण परिषदेसाठी निवड झाली आहे.ही परिषद जागतिक स्तरावर शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ,संशोधक आणि धोरणनिर्माते यांना एकत्र आणणारी महत्त्वपूर्ण व्यासपीठ मानली जाते. डॉ.सागर आटोळे यांची निवड ही संस्थेसाठी तसेच संपूर्ण परिसरासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

या परिषदेत भारतीय शैक्षणिक पद्धती, शिक्षणातील बदलते प्रवाह, नवोन्मेषी अध्यापन पद्धती तसेच युरोपमधील शिक्षण व्यवस्था आणि त्यातील आधुनिक दृष्टिकोन यावर सखोल चर्चा होणार आहे. जागतिक पातळीवर शिक्षण क्षेत्रात होत असलेल्या बदलांचा आढावा घेऊन परस्पर अनुभवांची देवाणघेवाण या परिषदेमध्ये होणार आहे.

डॉ.सागर आटोळे हे या परिषदेत स्वतः तयार केलेला शोधनिबंध सादर करणार आहेत. त्यांच्या शोधनिबंधामध्ये भारतीय शिक्षण व्यवस्थेतील मूल्याधिष्ठित शिक्षण, कौशल्याधारित अभ्यासक्रम,तंत्रज्ञानाचा वापर आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देणाऱ्या उपक्रमांचा सविस्तर ऊहापोह करण्यात आला आहे. भारतीय आणि युरोपियन शिक्षण पद्धतीतील साम्य-भेद तसेच दोन्ही प्रणालींमधील सकारात्मक बाबींचा समन्वय साधण्यावर त्यांनी विशेष भर दिला आहे.

डॉ.सागर आटोळे यांच्या या निवडीमुळे ज्ञानसागर गुरुकुलच्या शैक्षणिक कार्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे. त्यांच्या संशोधनामुळे भारतीय शिक्षण पद्धतीची वैशिष्ट्ये जागतिक व्यासपीठावर अधोरेखित होणार असून,शिक्षण क्षेत्रात नव्या संधी आणि सहकार्याच्या वाटा खुल्या होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या यशाबद्दल संस्थेचे शिक्षकवर्ग,विद्यार्थी आणि पालकवर्ग यांनी आनंद व्यक्त करत डॉ.सागर आटोळे यांचे अभिनंदन केले आहे.त्यांच्या या कामगिरीमुळे संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेला नवे परिमाण मिळणार असून, भविष्यातही अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय स्तरावर ज्ञानसागर गुरुकुलचा ठसा उमटत राहील,असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियान अंतर्गत शाळा तपासणी संपन्न

**जेजुरी (दै. संध्या)**

पुणे जिल्हा परिषदेचे माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी श्री. डॉ. भाऊसाहेब कारेकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या व अरुण थोरात जिल्हा मुख्याध्यापक संघाचे विश्वस्त,नंदकुमार सागर सचिव महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघ महामंडळ,प्रसाद गायकवाड अध्यक्ष पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघ,राजेश गायकवाड कार्याध्यक्ष पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघ, शिवाजी कामथे सचिव मुख्याध्यापक संघ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राबवल्या जाणाऱ्या शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियानांतर्गत शालेय तपासणी करण्यात आली.



शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियानांतर्गत सदगुरु नारायण महाराज माध्यमिक विद्यालय, नारायणपूर येथे शाळा तपासणी कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला. या वेळी पथक प्रमुख श्री. सुधाकर जगदाळे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रपती पुरस्कार विजेते श्री. कुंडलिकराव मेमाणे, श्री. दीपक गायकवाड, श्री. राजकुमार भोंगळे व श्री. विकास भोसले यांनी शाळेची सखोल पाहणी केली.

पथकाने शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता, विशेष उपक्रम,शिक्षक मूल्यमापन,अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, विद्यार्थ्यांचा सहभाग, शालेय उपक्रम , परीक्षा विभाग,प्रशासन व शालेय कामकाज,तसेच भौतिक व शैक्षणिक सुविधा यांचा सविस्तर आढावा घेतला. पाहणीदरम्यान शिक्षकांशी संवाद साधून गुणवत्ता संवर्धनासाठी आवश्यक मार्गदर्शन व उपयुक्त सूचना देण्यात आल्या.

या अभियानामुळे शाळेच्या सर्वांगीण शैक्षणिक विकासाला चालना मिळेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र चौगुले, उपशिक्षक भगवान घोळवे, देवराम कांबळे, बबन कदम व इतर सहकारी कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

## नितनवरे, गंगावणे यांना माता रमाई पुरस्कार प्रदान

**पिंपळे गुरव (दै. संध्या)**

नागलोक नारीशक्ती संघ यांच्यावतीने पिंपळे गुरव येथे राजमाता जिजाऊ, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, फातिमा शेख आणि माता रमाई आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती उत्सवानिमित्त अर्थदीप महिला सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षा रंजना नितनवरे, स्वयंदीप सोशल फाउंडेशनच्या प्रमुख मानसी वानखेडे, शीला गंगावणे आदींना माता रमाई पुरस्काराने गौरविण्यात आले.

वाडिया कॉलेजच्या प्राचार्या डॉ. वृषाली रणधीर, सामाजिक कार्यकर्त्या अस्मा शेख, युवा प्रबोधनकार प्रिया नप्ते, मंगल सावंत आदी उपस्थित होत्या. प्रा. सुनंदा काटे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या.

भारतीय बौद्ध महासभेच्या माजी अध्यक्षा रेखा ढेकळे, सावित्रीबाई फुले महिला संस्थेच्या अध्यक्षा सुजाता निकाळजे, बोधिसत्व सहकारी रुग्णालयाच्या संचालिका डॉ. मंगल आयरेकर (इंजे) व डॉ. उज्वला बेंडे यांनाही पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. 'विश्व घडवणाऱ्या राष्ट्रमाता' या विषयावरील नाटिकेत शीतल पाथर्डे, आमंती पाथर्डे, त्रिशीला वाकोडे आदींनी जीवनपट साकारला.



## चाकण येथील सेवांतर्गत रस्ते बनले मृत्यूचे सापळे

**चाकण (दै. संध्या)**

रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली सेवांतर्गत रस्त्यावर पसरलेल्या खडीमुळे अपघात वाढले आहेत. साईड पट्ट्या खचल्यामुळे अवजड वाहन अडकून पडत असल्याने वाहतूक कोंडी होत आहे. चाकण नगरपरिषद हद्दीत महामार्गालगत असणाऱ्या सेवांतर्गत रस्त्यावर करण्यात आलेल्या खोदकामामुळे रस्ते खराब झाले आहेत. रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली पसरण्यात आलेल्या खडीने वाहने घसरण्याचे प्रकार वाढले आहेत. चारी खोदून मुरूम, माती इतरत्र अस्ताव्यस्त फेकण्यात आल्याने दुचाकी चालकांना वाहने चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. जनावरांना चालताना लाज वाटेल असे रस्ते या भागात झाले असून, प्रशासन त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करत आहेत. ओव्हरटेकच्या प्रयत्नात अवजड वाहन रस्त्यालगत खोदण्यात आलेल्या चारीत कोसळण्याचे प्रकार यापूर्वी अनेकदा घडले आहेत. रस्त्याच्या दुरावस्थे बरोबरच चाकण हद्दीत कचऱ्याची समस्या अत्यंत गंभीर बनत चालली आहे. रस्त्याने येणारे जाणारे कामगार चलता चलता रस्त्यालगत कचरा फेकून देत असल्याने परिसरात दुर्गंधी सुटली आहे. चाकण शिक्रापूर रस्त्यावर मेदनकरवाडी, कडाचीवाडी, आळंदी फाटा आदी भागात जागोजागी कचरा पडला आहे. साचलेला हा कचरा वेळेवर उचलला जात नसल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

# खेड तालुक्यातील दोन गुन्हेगार स्थानबद्ध

## एमपीडीए कायद्यान्वये कारवाई



**चाकण (दै. संध्या)**

> "सराईत गुन्हेगारांना गुन्हे करण्यापासून परावृत्त करण्यासाठी ठोस उपाययोजना केल्या जात आहेत. तसेच गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी तातडीची व परिणामकारक प्रतिबंधक कारवाई करण्यात येत आहे."
> **- विनयकुमार चौबे, आयुक्त**

पिंपरी - चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीतील गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविण्यासाठी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या आदेशानुसार पोलिसांनी कडक पावले उचललेली आहेत. पोलीस उपायुक्तांच्या चारही परिमंडळ अंतर्गत जानेवारी महिन्यात एकूण ४७ सराईत गुन्हेगारांवर तडीपारीची कारवाई करण्यात आली आहे. खेड तालुक्यातील बऱ्याच गुन्हेगारांना संपूर्ण पुणे जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. त्याचबरोबर चाकण औद्योगिक भागातील दोन सराईत गुन्हेगारांना एमपीडीए कायद्यान्वये एका वर्षासाठी स्थानबद्ध करण्यात आले आहे. खून, खूनाचा प्रयत्न, जबरी चोरी, दरोड्याची तयारी, खंडणीसाठी अपहरण, गंभीर दुखापत, महिलांवरील अत्याचार, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे, तसेच तडीपार आदेशाचा भंग, अशा गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये सक्रिय असलेल्या सराईत गुन्हेगारांविरोधात ही व्यापक प्रतिबंधक कारवाई करण्यात आली. चाकण उत्तर व उत्तर महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत सक्रिय असलेले रंजीत लक्ष्मण येरकर (वय - १९ , रा. नाणेकरवाडी, ता. खेड) व रामदास मारुती साळुंके (वय - ३७, रा. आंबेठाण, ता. खेड) या दोघांवर एमपीडीए कायद्यान्वये कारवाई करण्यात आली. त्यांना अनुक्रमे येरवडा व नागपूर मध्यवर्ती कारागृहात एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्यात आले आहे. परिमंडळ १ मध्ये १०, परिमंडळ २ मध्ये ९, परिमंडळ ३ मध्ये १७ तर परिमंडळ ४ मध्ये ११ सराईत गुन्हेगारांना पुणे जिल्हा, पिंपरी - चिंचवड शहर व काही प्रकरणांत रायगड जिल्ह्यातील हद्दीतून ठराविक कालावधीसाठी तडीपार करण्यात आले आहे. तडीपार करण्यात आलेले हे गुन्हेगार २० ते ५० या वयोगटातील असून, त्यांच्यावर गंभीर व किरकोळ स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल आहेत. खेड तालुक्यातून हद्दपार करण्यात आलेल्या गुन्हेगारांमध्ये व्यंकटेश उर्फ हर्षल परशुराम जाधव (वय - २०, रा. नाणेकरवाडी, चाकण), पुरुषोत्तम कृष्णाजी डहाके (वय - ३२, रा. घुंडरे आळी, आळंदी), रोहिदास बबन गायकवाड (वय - ३८, रा. धानोरे, ता. खेड), महादेव विष्णू देवकाते (वय - २७, रा. केळगाव), सलमान हसन सय्यद (वय - २९,), नितीन शिवाजी येडे (वय - २८, रा. खंडेश्वर कॉलनी, चाकण), नितीन भाऊसाहेब निंबाळकर (वय - ३८, मुळ रा. अहिल्यानगर) व दत्तात्रय उर्फ बाळू लक्ष्मण खेडकर (वय - ४०, रा. भुजबळ आळी, चाकण) यांचा समावेश आहे. पिंपरी - चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीत चार परिमंडळांतर्गत २४ पोलीस ठाणे आहेत. या पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील ४०० पेक्षा जास्त गुन्हेगारांच्या हालचालींवर पोलिसांचे बारकाईने लक्ष आहे.

# भारतीय मजदूर संघाचे २१वे त्रैवार्षिक अधिवेशन पुरीत संपन्न

## २५ फेब्रुवारीला देशव्यापी 'सरकार जागवा' आंदोलन

जगन्नाथ पुरी (दै. संध्या)

भारतीय मजदूर संघाच्या (BMS) २१व्या त्रैवार्षिक अखिल भारतीय अधिवेशनाचा समारोप धर्मनगरी जगन्नाथ पुरी येथे उत्साहात झाला. ६ ते ८ फेब्रुवारीदरम्यान पार पडलेल्या या अधिवेशनात देशभरातील विविध क्षेत्रांतील हजारो प्रतिनिधींनी सहभाग घेत कामगारांच्या प्रश्नांवर सखोल चर्चा व मंथन केले.

अध्यक्षीय भाषणात अखिल भारतीय अध्यक्ष एस. मलेशम यांनी कामगारविरोधी धोरणांबाबत तीव्र चिंता व्यक्त करत २५ फेब्रुवारी २०२६ रोजी देशभरात जिल्हाधिकारी कार्यालये, शासकीय कार्यालये, कामगार कार्यालये व ई-कार्यालयांसमोर धरणे आंदोलन करण्याची घोषणा केली. या आंदोलनातून कामगार हितांचे



संरक्षण, कामगार संहितांमध्ये आवश्यक सुधारणा आणि "सरकार जागे व्हा" या मागणीसाठी जनजागृती करण्यात येणार आहे.

**नवीन अखिल भारतीय कार्यकारिणी जाहीर**

अधिवेशनाच्या अंतिम दिवशी २०२६ ते २०२९ या कालावधीसाठी नवीन अखिल भारतीय कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली.

एस. मलेशम (तेलंगणा) — अखिल भारतीय अध्यक्ष

सुरेंद्र कुमार पांडे (छत्तीसगड) — महामंत्री

बी. सुरेंद्रन — संघटन मंत्री

महाराष्ट्रातून अनिल ढुमणे (अखिल भारतीय सचिव), मोहन येणुरे (क्षेत्रीय सहसंघटक), जयंत देशपांडे (असंघटित क्षेत्र प्रमुख), शर्मिला पाटील व तृप्ती आळती (महिला विभाग प्रमुख) यांची निवड जाहीर करण्यात आली.

अधिवेशनातील महत्त्वाचे ठराव

कामगारांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी अधिवेशनात अनेक महत्त्वपूर्ण ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. त्यात सर्व श्रेणीतील कामगारांवर कामगार कायदे समानपणे लागू करणे, ठेका प्रथेत सुधारणा करून शोषण थांबवणे, आंगणवाडी सेविका व मदतनीसांना शासकीय कर्मचारी दर्जा व सामाजिक सुरक्षा देणे, सरकार-नियोक्ता-कामगार यांच्यातील त्रिपक्षीय संवाद यंत्रणा पुनरुज्जीवित करणे, शासकीय व सार्वजनिक क्षेत्रातील भरती प्रक्रिया सुरू करणे आणि सोशल सिक्युरिटी कोड व वेज कोड प्रभावीपणे अंमलात आणणे यांचा समावेश आहे.

तसेच पीएफ, ईएसआय, पेन्शन, ग्रॅच्युइटी व बोनस यांसारख्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय न झाल्यास २५ फेब्रुवारी रोजी देशभर 'सरकार जागवा' आंदोलन करण्याचा निर्धार करण्यात आला. कंत्राटी कामगारांच्या समस्यांवरही विशेष ठराव मंजूर करण्यात आले असून या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघाचे सरचिटणीस सचिन मेंगाळे यांनी केले आहे.

महामंत्र्यांचे मत

नवनियुक्त महामंत्री सुरेंद्र कुमार पांडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "भारतीय मजदूर संघ येत्या काळात समाजाच्या शेवटच्या टोकावर उभ्या असलेल्या कामगारांच्या सन्मान व अधिकारांसाठी संघर्ष अधिक तीव्र करेल. राष्ट्रनिर्मितीत कामगारांचा सन्मानजनक सहभाग सुनिश्चित करणे हेच आमचे ध्येय आहे."

अधिवेशनाचा समारोप देशव्यापी, संघटित व सातत्यपूर्ण संघर्षाच्या निर्धाराने करण्यात आला, अशी माहिती सचिन मेंगाळे यांनी दिली.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### स्पेशल ऑलिम्पिक नॅशनल ॲथलेटिक्स गेम्स मध्ये दैदीप्यमान यश मिळवून नाव उंचावले

पेण (दैनिक संध्या) : ५ व ६ फेब्रुवारी २०२६, रोजी रोहतक, हरियाणा येथील स्पेशल ऑलिम्पिक भारत आयोजित नॅशनल ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धा अत्यंत उत्साहात पार पडल्या. या नॅशनल स्पर्धामध्ये संपूर्ण देशातील २७ राज्यांमधील ५१० दिव्यांग खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या स्पर्धामध्ये सुहित जीवन ट्रस्ट, पेण येथील विद्यार्थीनी कु. सिद्धीका मंदार पाटील १०० मीटर धावणे यात रौप्य पदक तसेच जॅवलिंग रौप्य पदक पटकावले. तसेच कु. अर्जुन पांडुरंग वारे - रनिंग लॉंग जंप - रौप्य पदक मिळवत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. ही बाब केवळ संस्था व रायगड जिल्ह्यासाठीच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी अत्यंत अभिमानाची आहे त्यामुळे अर्जुन व सिद्धिका यांच्यावर संपूर्ण महाराष्ट्रातून अभिनंदन व कौतुकांचा वर्षाव होत आहे. या यशामागे या विद्यार्थ्यांचे पालक, संस्थेचे विश्वस्त,प्रशिक्षक अमोल काईनकर तसेच सर्व शुभचिंतक व हितचिंतक यांचा मोलाचा सहभाग आहे.



### आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलकडून 'राइड फॉर लाइफ'द्वारे जनजागृतीचा उपक्रम

पुणे (दैनिक संध्या) : जागतिक कर्करोग दिनाच्या निमित्ताने आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलच्या सर्वसमावेशक कर्करोग देखभाल मंच 'ऑन्को+ द सेंटर ऑफ ऑन्कोलॉजी एक्सलन्स'तर्फे पुण्यात 'राइड फॉर लाइफ' कर्करोग जनजागृती बाइक रॅलीचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून कर्करोगाविषयी जागरूकता वाढवणे, प्रतिबंधाला प्रोत्साहन देणे आणि आजाराचे लवकर निदान करण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. सकाळी ९.३० वाजता सुरू झालेल्या या रॅलीत डॉक्टर, आरोग्यसेवक तसेच हॉस्पिटलमधील १५० हून अधिक कर्मचारी सहभागी झाले होते. "युनायटेड बाय युनिक" या संकल्पनेअंतर्गत आयोजित या रॅलीत कर्करोगाचा प्रत्येक प्रवास वेगळा असला, तरी या आजाराविषयी जनजागृतीची जबाबदारी सर्वांचीच आहे, हा संदेश देण्यात आला. कर्करोगाविषयीची चर्चा हॉस्पिटलच्या चौकटीबाहेर समाजापर्यंत पोहोचवणे, हे या उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट होते. या उपक्रमाबाबत आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटल, पुणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) पामेश गुप्ता म्हणाले, "कर्करोगावरील उपचारांपूर्वी जागरूकता, प्रतिबंध आणि वेळेवर तपासणी या बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. समाजात ज्ञान आणि सहभाग असेल, तर सकारात्मक आणि दीर्घकालीन बदल घडवता येतात. 'राइड फॉर लाइफ' या रॅलीच्या माध्यमातून आम्ही हाच संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. ऑन्को+ अंतर्गत आम्ही उपचारांपलीकडे जाऊन प्रतिबंधावर आधारित कर्करोग देखभाल अधिक बळकट करण्यासाठी कटिबद्ध आहोत." ऑन्को+ च्या माध्यमातून आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलमध्ये एकात्मिक व सर्वांगीण कर्करोग देखभाल सेवा पुरवली जाते. तज्ज्ञ ऑन्कोलॉजिस्ट्स, प्रगत निदान प्रणाली आणि मल्टिडिसिप्लिनरी उपचार पद्धती यांचा समन्वय साधत लवकर निदान आणि प्रतिबंधावर विशेष भर देण्यात येतो. सातत्यपूर्ण जनजागृती आणि वेळेवर हस्तक्षेपातून कर्करोगाचे ओझे कमी करण्याचे दीर्घकालीन ध्येय या मंचातून प्रतिबिंबित होते. 'राइड फॉर लाइफ' बाइक रॅली ही कर्करोगाबाबत जागरूक समाज घडवण्याच्या दिशेने हॉस्पिटलने उचललेले एक महत्त्वाचे पाऊल असून, जागरूकतेतून कृती आणि लवकर निदानातून चांगले उपचार परिणाम साध्य करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. जागतिक कर्करोग दिनानिमित्त आयोजित या रॅलीद्वारे आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलने कर्करोगाविरुद्धच्या लढ्यात जागरूकता, प्रतिबंधात्मक उपाय आणि आशेचा निर्धार अधिक दृढ केला आहे.

### विजयाचा गुलाल अन् डोळ्यांत पाणी

लोणावळा (दैनिक संध्या) : जिल्हा परिषदेच्या मावळ तालुक्यातील पाच गट आणि पंचायत समितीच्या दहा जागांसाठी झालेल्या निवडणुकीच्या निकालात राष्ट्रवादी काँग्रेसने सर्व जागा जिंकत निर्विवाद वर्चस्व राखले. पण, यावेळी एकीकडे विजयाचा गुलाल उधळला जात असताना विजयी उमेदवार आणि कार्यकर्त्यांच्या डोळ्यांत अजित पवार यांच्या आठवणींनी पाणी आले. काहींचा आवाजही जड झाला होता. वडगाव येथील नवीन तहसील कार्यालयात सोमवारी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास मतमोजणीस सुरुवात झाली. निकाल ऐकण्यासाठी सकाळपासूनच मतमोजणी केंद्राबाहेर पंचायत समितीच्या आवारात उमेदवारांच्या समर्थक व राजकीय पक्षांच्या तालुक्यातून आलेल्या कार्यकर्त्यांनी मतमोजणी केंद्राबाहेर मोठ्या संख्येने हजेरी लावली. प्रत्येक फेरीनंतर बदलणारी राजकीय समीकरणे यामुळे संपूर्ण तालुक्यात प्रचंड उत्कंठा पाहायला मिळाली. विजयानंतर कार्यकर्त्यांनी गुलाल आणि भंडाऱ्याची मुक्तहस्ते उधळण करत आसमंत दुमदुमून टाकला. मात्र निकालाची ओढ इतकी होती की समर्थकांचा उत्साह रोखणे कठीण झाले होते. जसा जसा निकाल जाहीर होऊ लागला, तसतसा घोषणाबाजीचा जोर वाढत गेला. दरम्यान अनुचित प्रकार टाळण्यासाठी प्रशासनाने मोठा पोलिस बंदोबस्त तैनात केला होता. येथील शिवराज हॉटेल ते वडगाव पोलिस ठाणे, पीडब्ल्यूडी कार्यालय तसेच रेल्वे स्थानक रस्ता येथे पोलिसांनी बॅरिकेडिंग करत समर्थकांना रोखले होते. निकालानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे विजयी उमेदवार व कार्यकर्त्यांनी पोटोबा महाराज मंदिरापर्यंत विजयी फेरी काढली.

## "माझा जीवशास्त्राचा शैक्षणिक पार्श्वभूमी अभिनय करताना उपयोगी पडेल

मुंबई (दै. संध्या)

अग्रगण्य कौटुंबिक मनोरंजन वाहिनी सोनी सब लवकरच आपली वैद्यकीय मालिका हुई गुम यादें – एक डॉक्टर, दो जिंदगीयाँ सादर करत आहे. ही मालिका जागतिक स्तरावर प्रशंसित इटालियन मालिका डीओसी ची भारतीय रूपांतरित आवृत्ती आहे. जीवनातील दुसऱ्या संधी आणि ओळख या विषयावर आधारित ही कथा डॉ. देव (इकबाल खान) यांच्या असामान्य प्रवासाचे चित्रण करते, जे एका अपघातात आठ वर्षांची स्मृती गमावतात आणि त्यानंतर त्यांना आपले जग पुन्हा उभारावे लागते. अभिनेत्री सृष्टी सिंग, जी लवकरच डॉ. वाणीची भूमिका साकारणार आहे, यांनी अलीकडेच सांगितले की जीवशास्त्रातील त्यांचा शैक्षणिक पार्श्वभूमी हा पात्रासाठी तयारी करताना अनपेक्षितपणे फायदेशीर ठरला. मालिकेत वैद्यकीय बारकावे दाखवले जात असल्याने सृष्टीला पटकथेशी नैसर्गिकरित्या जोडले जाणे सोपे झाले. मालिकेच्या वाचन सत्रांदरम्यान, ज्यात वैद्यकीय संज्ञांचा उल्लेख वारंवार होत असे, सृष्टीला त्या भाषेशी सहज जुळवून घेता आले. अनेक सहकलाकारांना त्या संज्ञा समजून घेण्यासाठी वेळ लागत असताना, सृष्टी सहजपणे त्या चर्चांचा अर्थ समजू शकत होती. या अनुभवाबद्दल बोलताना सृष्टी सिंग म्हणाल्या, "माझा जीवशास्त्राचा



पार्श्वभूमी अभिनय करताना उपयोगी पडेल असे मी कधीच विचार केला नव्हता, पण यादें ने मला शिकवले की आपण घेतलेला प्रत्येक अनुभव कुठेतरी मूल्य वाढवतो. वाचन सत्रांदरम्यान जेव्हा वैद्यकीय संज्ञा चर्चेत येत होत्या, तेव्हा मला संदर्भ पटकन समजून घेणे आणि परिस्थितीची कल्पना करणे सोपे झाले. त्या समजुतीमुळे मला डॉ. वाणीच्या भूमिकेकडे अधिक आत्मविश्वासाने आणि वास्तवतेने पाहता आले. माझ्या आयुष्यातील विविध पैलू या भूमिकेत एकत्र आले याबद्दल मी कृतज्ञ आहे."

## पंढरपूर येथे राष्ट्रीय नैसर्गिक शेती फेडरेशनची स्थापना

पंढरपूर (दै. संध्या)

रासायनिक खते व कीटकनाशकांच्या प्रभावामुळे भारतातील ३० टक्के जमिनी नापिक झाल्या आहेत, देशात दरवर्षी पंधरा लाख पेक्षा अधिक नागरिकांना कॅन्सर सारखा गंभीर आजार होत आहे. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी, ग्रामीण रोजगार निर्मितीसाठी अथवा पर्यावरण संतुलनासाठी नैसर्गिक शेतीची लोकचळवळ उभारणी करणे काळजी गरज आहे. यासाठी संत गजानन महाराज प्रगट दिनाचे निमित्त साधून, सोशल रिस्पॉन्सिबिलिटी, राष्ट्रीय कर्तव्य अभियान समुहांच्या माध्यमातून, सदगुरु दुंडा महाराज (देगलूरकर) मठ पंढरपूर येथे राष्ट्रीय नैसर्गिक शेती फेडरेशन ची स्थापना करण्यात आली.

यावेळी कृषी भूषण तात्या मगर, राष्ट्रीय कर्तव्य अभियानाचे मुख्य विजय वरुडकर, संघ जिल्हा कार्यवाह प्रताप टपले, सोशल रिस्पॉन्सिबिलिटी समुहाचे संचालक आचार्य ज्ञानेश्वर शिंदे, खुशालचंद मोरे, सुरेश घाडगे, पांडुरंग बरळ, दत्तात्रय हरळे,



गजानन मगर, नानासाहेब जाधव, हनुमंत जाधव, कलप्पा भतगुणकी, उदय मुळे, विठ्ठल क्षीरसागर, अरुण जगताप, प्रताप देशमुख, शुभम अडबाल, डॉ. बापु तारसे इतर शेतकरी उपस्थित होते.

सोशल रिस्पॉन्सिबिलिटी समूह गेली १२ वर्षा पेक्षा अधिक काळ सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. आज पर्यंत सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या राज्यातील ३००० पेक्षा अधिक सामाजिक संस्था, १००० पेक्षा अधिक गोशाळा गोपालक, ५००० पेक्षा अधिक कीर्तनकार यांची बांधणी करण्यात आली आहे. मागील वर्षी महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून ५००० पेक्षा अधिक शेतकऱ्यांना नैसर्गिक शेती विषयी प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले होते.

ग्रामीण स्वावलंबन विषयी काम करतांना गट शेतीतून कृषी उद्योग विकसित करणे हा हेतू ठेऊन राष्ट्रीय नैसर्गिक शेती फेडरेशन कार्यरत असणार आहे.

भविष्यात उद्योगांचे दाईत्व आलेल्या सीएसआर प्रकल्पांची जोडणी ग्राम समस्या निवारणासाठी व नैसर्गिक शेती प्रकल्प गतिशील करण्यासाठी सोशल रिस्पॉन्सिबिलिटी समूह प्रयत्नशील असेल असे विजय वरुडकर यांनी सांगितले.

प्रांत, जिल्हा व तालुका स्तरावर संयोजक समिती स्थापन करून गाव, गोशाळा, शेतकरी गट अथवा बचत गट यांना केंद्र करून नैसर्गिक शेती प्रकल्पांची

ज्ञानेश्वर शिंदे म्हणाले की गेली एक वर्ष आम्ही या फेडरेशनच्या बांधणी व कामकाज विषयी विचार विनिमय करत आहोत. महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल महामहीम आचार्य देवव्रत हे सच्चे गोभक्त व नैसर्गिक शेती चे प्रवर्तक आहेत. आम्ही लवकरच माननीय राज्यपाल यांची भेट घेऊन नैसर्गिक शेती प्रकल्पांची पुढील वाटचाल आपणास कळवू. राष्ट्रीय नैसर्गिक शेती फेडरेशन लोक चळवळीसोबत जुडण्यासाठी ७५८८९५४५८० या क्रमांक वर संपर्क साधावा अशी माहिती देण्यात आली.

बांधणी व प्रशिक्षण सत्र आयोजन केले जाईल असे सांगण्यात आले.

कृषी भूषण तात्या मगर यांनी सांगितले की, रासायनिक खत बी बियाणांवर दर वर्षी दीड लाख करोड पेक्षा अधिक रुपयांचे अनुदान केंद्र सरकार देत आहे. त्या एवजी शेतकऱ्यांना देशी गोवंश पालनासाठी, नैसर्गिक शेतीसाठी आर्थिक अनुदान सरकार नी द्यावे. ज्या मुळे खऱ्या अर्थाने शेती विकास होईल.

## पाच अनोख्या प्रसिध्द व्यक्तींच्या निवासस्थानाच्या दौऱ्यासह पुनरागमन

मुंबई (दै. संध्या)

भारताची आघाडीची पेंट व सजावट कंपनी एशियन पेन्ट्स आपल्या बहुचर्चित होम डेकोर व स्टोरीटेलिंग उपक्रम 'एशियन पेन्ट्स व्हेअर द हार्ट इज' चा नववा सीझन घेऊन परतली आहे. गेल्या अनेक वर्षांत ही मालिका केवळ घरांच्या सजावटीपुरती मर्यादित न राहता, त्या घरात राहणाऱ्या व्यक्तींच्या भावना, आठवणी आणि जीवनमूल्यांचे प्रतिबिंब म्हणून ओळखली जाऊ लागली आहे. सीझन ९ हीच परंपरा पुढे नेत, भिंती व रंगांपलीकडील कथा उलगडतो— जिथे भावना, आठवणी आणि मूल्ये घराला खऱ्या अर्थाने 'घर' बनवतात.




या सीझनमध्ये भारतातील काही सर्वाधिक लोकप्रिय व्यक्तिमत्त्वांची पाच वेगवेगळी घरे प्रेक्षकांसमोर उघडली जातील ज्यामध्ये आहेत सोनाक्षी सिन्हा व झहीर इक्बाल, गौतम गंभीर, कीर्ती सुरेश व अँटोनी थट्टिल, अर्चना पूरन सिंग व परमीत सेठी, तसेच अमन व प्रिया गुप्ता.प्रत्येकाचे निवासस्थान शैली, भौगोलिक स्थान आणि व्यक्तिमत्त्वाच्या बाबतीत वेगळे असले तरी, त्या सर्वांमध्ये उबदारपणा, प्रामाणिकपणा आणि एक सशक्त भावनिक संबंध समान आहे. या संपूर्ण सीझनमध्ये घरं ही नात्यांनी, दैनंदिन सवयींनी, आठवणींनी आणि जीवनातील छोट्या-छोट्या क्षणांनी घडलेली जिवंत कॅनव्हास कशी बनतात, हे दाखवण्यात येते.

प्रेक्षकांना अशा घरांमध्ये प्रवेश मिळतो, जी खऱ्या अर्थाने 'जगलेली' वाटतात.अर्चना आणि परमीत त्यांचे मढ येथील अँग्लो-स्पॅनिश शैलीतील घर दाखवतात जे निसर्ग, कुटुंब आणि सामायिक आठवणींमध्ये हळूहळू विकसित झाले आहे.कीर्ती आणि अँटोनी यांचे रंगीबेरंगी कोची येथील अपार्टमेंट तिच्या रंगांशी असलेल्या सहज नात्याचे प्रतिबिंब आहे, जिथे आनंदी आणि खेळकर घटक दैनंदिन जीवनासाठी खास जागा निर्माण करतात.तर सोनाक्षी आणि झहीर त्यांच्या 'सादा' नावाच्या पेंटहाऊसचे दरवाजे उघडतात जिथे सनकेन पिटमधील गप्पांपासून ते शांत, आठवणींनी भरलेल्या कोपऱ्यांपर्यंत अनेक भावछटा अनुभवायला मिळतात. गौतमचे शांत, प्रकाशाने भरलेले निवासस्थान त्याच्या सार्वजनिक प्रतिमेशी काहीसे विसंगत आहे; हे स्थान शांत शिस्त आणि निवांत क्षणांसाठी तयार केले आहे, जिथे क्रिकेटच्या स्मृतीचिन्हांसाठी विचारपूर्वक डिझाइन केलेला कोपरा हा यशापेक्षा वारशासाठी एक आदरस्थान ठरतो तर अमन आणि प्रिया यांचे गुरुग्राममधील निवासस्थान अनौपचारिकता, सर्जनशीलता आणि एकत्र वेळ घालवण्यासाठी डिझाइन केले आहे, जिथे मोकळ्या जागांमध्ये मुले मुक्तपणे बागडतात आणि संभाषणे सहजपणे खुलतात. या पाचही घरांमध्ये, परिपूर्णता नव्हे, तर व्यक्तिमत्त्व व्यक्त होते; या जागांना प्रेम, जगलेले क्षण आणि ही घरे खरोखरच तिथे राहणाऱ्या मालकांचीच आहेत हा विश्वास आकार देतात. हा सीझन घरात केवळ सजावटीची निवडीपेक्षा रंग, पोत आणि सजावट हे पैलू कशा प्रकारे भावनिक साधने बनतात हे अधोरेखित करतो. ब्युटीफुल होम्स पेंटिंग सर्व्हिसेसच्या माध्यमातून, अर्चनाच्या दिवाणखान्यातील 'वॉल ऑफ मेमरीज' आणि कीर्तीच्या शयनगृहातील पारंपरिक वैशिष्ट्ये एशियन पेंट्स निलया आर्क मोतिया चुनखळी फिनिशने अधिक सुंदर बनवली आहेत. गौतमच्या घरात, निलया आर्क मधील नताशाला आवडणारा मॅट पांढरा रंग, क्रिकेटच्या अविस्मरणीय आठवणींसाठी पार्श्वभूमी तयार करतो.

## डेटा सायन्स प्रोग्रामसह त्यांच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा विस्तार

मुंबई (दै. संध्या)

दिल्लीतील साउथहॅम्प्टन विद्यापीठाने एक नवीन एक वर्षाचा एमएससी (डेटा सायन्स) कार्यक्रम सुरू केला आहे, ज्याचा उद्देश वास्तविक-जगातील, मानव-केंद्रित आव्हानांना तोंड देण्यासाठी प्रगत विश्लेषणात्मक, संगणकीय आणि संशोधन कौशल्ये विकसित करणे आहे. क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग २०२६ मध्ये जगातील शीर्ष १०० विद्यापीठांमध्ये स्थान मिळवलेल्या या विद्यापीठाने, त्याच्या जागतिक शैक्षणिक अनुभवासह, उद्योग, सरकार आणि शैक्षणिक क्षेत्रात सिद्धांत जबाबदारीने आणि प्रभावीपणे लागू करू शकणाऱ्या डेटा शास्त्रज्ञांच्या वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी हा कार्यक्रम सुरू केला आहे. डेटा सायन्समधील हा एक वर्षाचा एमएससी प्रोग्राम आजच्या डेटा-चालित अर्थव्यवस्थेच्या गरजांनुसार तयार केलेला अनुप्रयोग-आधारित शिक्षण अनुभव देतो. अभ्यासक्रमात मशीन लर्निंग, मोठे डेटा तंत्रज्ञान, प्रगत विश्लेषण आणि सामाजिक डेटा विश्लेषण यांचा समावेश आहे, ज्यामध्ये वास्तविक समस्या सोडवणे, स्वतंत्र संशोधन आणि डेटाचा नैतिक आणि जबाबदार वापर यावर विशेष भर दिला जातो. हा कार्यक्रम संगणक विज्ञान किंवा संबंधित विषयांमध्ये, जसे की सॉफ्टवेअर/कॉम्प्युटर अभियांत्रिकी, गणित, सांख्यिकी किंवा भौतिकशास्त्र या विषयात पदवीधर पदवी असलेल्या उमेदवारांसाठी खुला आहे, ज्यांनी किमान ६५% गुण किंवा समतुल्य आंतरराष्ट्रीय पात्रता मिळवली आहे. अर्जदारांनी पायथॉन, जावा, मॅटलॅब किंवा सी++ सारख्या किमान एका प्रोग्रामिंग भाषेत प्रवीण असणे आवश्यक आहे आणि त्यांनी प्रगत गणिताशी संबंधित मॉड्यूल, विशेषतः सांख्यिकी किंवा संभाव्यतेचा अभ्यास केलेला असणे आवश्यक आहे. इंग्रजी भाषेतील प्रवीणतेच्या आवश्यकता देखील पूर्ण केल्या पाहिजेत. कार्यक्रमावर भाष्य करताना, साउथहॅम्प्टन दिल्ली विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रोव्होस्ट, प्रोफेसर एलोइस फिलिप्स म्हणाल्या, "जगभरातील विद्यापीठे वाढत्या प्रमाणात हे लक्षात घेत आहेत की आजच्या जटिल आणि डेटा-चालित जगाशी जुळवून घेण्यासाठी पदव्युत्तर शिक्षण विकसित होणे आवश्यक आहे.

## आरएसएसचे 'सांस्कृतिक राजकारण' देशाला विनाशाकडे नेणारे : ॲड. प्रकाश आंबेडकर

मुंबई (दै. संध्या)

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) सध्या आपल्या सोयीनुसार भूमिका बदलत असून, ज्या गोष्टींना पूर्वी तुच्छ मानले जात होते, त्यांनाच आता 'कॅश इन' करण्याचे काम संघ करत आहे. आरएसएसचे चरित्र आता 'डी-बेस' आणि 'डी-डिफाइन' असे झाले आहे, अशी सडकून टीका वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी आज येथे आयोजित पत्रकार परिषदेत केली. यावेळी त्यांनी सरसंघचालक मोहन भागवत यांना गोलवलकरांच्या विचारांवरून जाहीर आव्हान दिले. ॲड. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, मोहन भागवत आज सर्वसमावेशकतेच्या गप्पा मारत असले तरी, त्यांनी एक गोष्ट स्पष्ट करावी—एम.एस. गोलवलकर यांनी 'बंच ऑफ थॉट्स'मध्ये मांडलेला सांस्कृतिक रोडमॅप ते कंडेम (अमान्य) करतात का? मुंबईत मवाळ आणि उत्तर भारतात आक्रमक अशी दुटप्पी भूमिका संघ घेत आहे. उत्तर भारतात सामाजिक चळवळी रुजलेल्या नसल्याचा फायदा संघ उचलत असल्याचा आरोपही त्यांनी केला. यूजीसीच्या नव्या इक्विटी नियमावलीचा संदर्भ देत ॲड. प्रकाश आंबेडकर म्हणाले, २०१२ मध्ये ही नियमावली केवळ एससी-एसटीसाठी होती, आता त्यात ओबीसींचा समावेश झाला आहे. मात्र, संघप्रेरित संघटना ओबीसींना यातून वगळण्यासाठी छुपे आंदोलन करत आहेत. ओबीसींवर होणाऱ्या



अन्यायावर आरएसएसची चुप्पी ही चिंतेची बाब आहे. सावरकरांच्या मुद्द्यावर बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, सावरकरांचे दोन चेहरे आहेत. "अटकेपूर्वीचे सावरकर क्रांतिकारी होते, पण सुटकेनंतर त्यांनी ब्रिटिशांना मदत केली. पत्री सरकारच्या काळात क्रांतिकारकांना पकडून देण्याचे काम हिंदू महासभेने केले. अशा व्यक्तीला भारतरत्न देणे आम्हाला मान्य नाही, असे ते ठामपणे म्हणाले.

देशाच्या सीमासुरक्षेबाबत बोलताना आंबेडकरांनी मोदी सरकारवर निशाणा साधला. चीनने लडाखमध्ये घुसखोरी केली असतानाही सरकार आदेश का देत नाही? असा सवाल त्यांनी केला. "गाठ्या आणि फाफड्यांकडून लढाऊ भूमिकेची अपेक्षा करणे मूर्खपणाचे आहे. चीनचे लक्ष भारताच्या ३५ कोटींच्या मध्यमवर्गीय ग्राहक बाजारपेठेवर आहे. जर आपण आर्थिक आणि लष्करीदृष्ट्या सक्षम झालो नाही, तर भविष्यात मोठे संकट ओढवेल," असा इशारा त्यांनी दिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना संरक्षण दिले होते. मात्र, आज भाजप सरकार जागतिक करारांच्या नावाखाली 'मंडी व्यवस्था' मोडीत काढत आहे. गॅट कराराच्या काळात जशा आत्महत्या वाढल्या, तशीच स्थिती पुन्हा निर्माण होत असून सरकार बड्या कंपन्यांसाठी बाजारपेठ खुली करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

निवडणुकीतील गणितांवर भाष्य करताना आंबेडकर म्हणाले की, काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाने युतीकडे गांभीर्याने पाहिले नाही. मुंबईतील पदाधिकारी निरुत्साही होते. आम्ही मुस्लिम मतदार दूर जात असल्याचा इशारा दिला होता, पण काँग्रेसने आवश्यक पावले उचलली नाहीत. परिणामी, हक्काचा मतदार एमआयएमकडे वळला. काँग्रेसने युती निभावली असती, तर महापालिकेत ८०-८५ जागा जिंकता आल्या असत्या, असे मत त्यांनी व्यक्त केले.

शेवटी, डॉ. बाबासाहेबांच्या शब्दांची आठवण करून देत ते म्हणाले की, जर आपण आता सावध झालो नाही, तर भविष्यात दोष द्यायला कोणी उरणार नाही, दोष स्वतःलाच द्यावा लागेल.

# दै. संध्याचा ७०वा वर्धापनदिन उत्साहात साजरा

सोहळ्यातील काही क्षणचित्रे





















